पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ▪ वर्ष १५ ▪ अंक १५८ ▪ सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ ▪ मुल्य ३ रुपये ▪ पृष्ठे ६

RNI No.-MAHMAR/2012/49642 ▪ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ▪ Email: citynewss80@gmail.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा

# आज महापालिका निवडणुकांचा बिगुल

## ▪ दुपारी 4 वाजता निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद ▪ आचारसंहिता लागू होण्याची शक्यता



प्रतिनिधी १५ डिसेंबर

**मुंबई / अकोला :** मुंबई, ठाणे, पुण्यासह राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या निवडणुकांची घोषणा आज होण्याची दाट शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक प्रक्रियेची जवळपास सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून, आज दुपारी ४ वाजता आयोगाने पत्रकार परिषदेचे आयोजन केले आहे. या पत्रकार परिषदेत महापालिका निवडणुकांच्या तारखा, मतदानाचा कालावधी तसेच निकाल जाहीर होण्याची संभाव्य तारीख याबाबत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. अकोल्यात आज भाजपच्या इच्छूक नगरसेवकांच्या मुलाखती होत आहे. भाजपमध्ये ८०० लोकांनी आपले अर्ज दाखल केले असून काहींच्या मुलाखती आज सकाळ पासून भाजप कार्यालयात सुरु झाल्या आहेत. गेल्या निवडणुकीत अकोल्यात भाजप हा सर्वात मोठा पक्ष होता त्याच बरोबर भाजपची अकोल्यात सत्ता होती.

निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच राज्यात आचारसंहिता तात्काळ लागू होईल. त्यामुळे संबंधित महापालिका क्षेत्रांमध्ये नवीन घोषणा, निर्णय आणि विकासकामांवर निर्बंध येणार आहेत. आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रशासन आणि राजकीय पक्षांची हालचाल वाढणार असून, निवडणूक प्रचाराला वेग येईल. राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे असून, आगामी महापालिका निवडणुका अत्यंत चुरशीच्या ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा ठरण्याची चिन्हे आहेत. राज्य निवडणूक आयोगाने आज सायंकाळी चार वाजता मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे पत्रकार परिषद आयोजित केली आहे. या पत्रकार परिषदेमध्ये महानगरपालिका निवडणुकांबाबत अधिकृत घोषणा होणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. कालच राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपले असून, त्यानंतर लगेचच निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद बोलावल्यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे. त्यामुळे आजच महापालिका निवडणुकांची घोषणा होऊन राज्यभर आचारसंहिता लागू होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. आयोगाच्या पत्रकार परिषदेतील निर्णयांवर पुढील राजकीय घडामोडींची दिशा निश्चित होणार असल्याने सर्वच पक्ष, संभाव्य उमेदवार आणि प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाल्याचे चित्र आहे.

### भाजप अकोला मनपा निवडणूक मुलाखती

भारतीय जनता पक्षाच्या वतीने अकोला महानगरपालिका निवडणुकीमध्ये इच्छुक उमेदवारांची मुलाखत आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल विजय अग्रवाल जयंत मसने संतोष शिवरकर, डॉक्टर अमित कावरे यांच्या नेतृत्वात सुरू झाली.

### तर राज्यात तात्काळ आचारसंहिता लागू होईल

◆एकंदरीत, आज होणारी राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. जर आज निवडणुकांची घोषणा झाली, तर राज्यात तात्काळ आचारसंहिता लागू होईल आणि विकासकामांपासून प्रशासकीय निर्णयांपर्यंत अनेक बाबींवर निर्बंध येतील. राजकीय पक्षांकडून उमेदवार निश्चिती, प्रचार रणनीती आणि युती-आघाड्यांबाबत हालचाली अधिक तीव्र होतील. त्यामुळे आज सायंकाळी चार वाजता आयोगाकडून नेमकी कोणती घोषणा होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. निवडणूक रणधुमाळीला आजच अधिकृत सुरुवात होते का, हे काही तासांतच स्पष्ट होणार आहे.

## अखेर तेजस्वी घोसाळकरांचा शिवसेनेला (उबाठा) जय महाराष्ट्र

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर यांनी अखेर पक्षाला जय महाराष्ट्र केला आहे. तेजस्वी घोसाळकर या ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका आहेत. तर, ठाकरे गटाचे नेते विनोद घोसाळकर यांच्या सून आहेत.तेजस्वी घोसाळकर यांचा राजीनामा हा स्थानिक पातळीवर ठाकरे गटाला धक्का मानला जात आहे. तर, भाजपची ताकद वाढणार आहे. मुंबई महापालिका निवडणुकीचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर घोसाळकर यांचा प्रभाग आरक्षित झाला होता. त्यानंतर त्यांनी प्रभाग आरक्षित झाल्याने नाराजी व्यक्त केली होती.

## ऑस्ट्रेलिया गोळीबार प्रकरणात पाकिस्तान कनेक्शन उघड!

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**सिडनी :** ऑस्ट्रेलियातील सिडनी येथील बॉंडी बीचवर ज्यू समुदायाच्या एका कार्यक्रमा दरम्यान दोन बंदुकधाऱ्यांनी केलेल्या गोळीबारात १६ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती ऑस्ट्रेलियाच्या अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. पोलिसांनी हा हल्ला दहशतवादी असल्याचे स्पष्ट केले आहे.

या घटनेत एक हल्लेखोर पोलिसांच्या गोळीबारात ठार झाला असून, दुसऱ्या हल्लेखोराला अटक करण्यात आली आहे. आरोपी पाकिस्तानमधील बाप–लेक असल्याचे निष्पन्न झाले आहे. साजीद अक्राम (वय ५०) असे पित्याचे नाव असून, नवीद अक्राम (वय २४) असे मुलाचे नाव आहे.

## 'त्या' आरोपीला फाशीच; राष्ट्रपतींनी फेटाळली दयेची याचिका!

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**नवी दिल्ली:** महाराष्ट्रात २०१२ साली एका दोन वर्षाच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार आणि हत्या केल्याप्रकरणी फाशीची शिक्षा सुनावलेल्या एका आरोपीची दयेची याचिका राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी फेटाळली. २०२२ रोजी राष्ट्रपतिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मुर्मू यांनी फेटाळलेली ही तिसरी दयेची याचिका आहे. आरोपीचे नाव रवी अशोक घुमारे, असे असून त्याने ८ मार्च २०१२ रोजी दोन वर्षाच्या मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून तिच्यातर बलात्कार केला आणि नंतर तिची हत्या केली होती. ही घटना जालना शहरात इंदिरानगर भागात घडली होती.

# 'सत्ताविरोधी लाटेची' स्पष्ट चिन्हे

## ◆ माजी नगरसेवकांपुढे मोठे आव्हान !

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अकोला :** महापालिका निवडणुकीच्या तोंडावर आरआरसी नेटवर्कने विविध प्रभागांमध्ये घेतलेल्या जनमत सर्वेक्षणातून एक चिंताजनक चित्र समोर आले आहे. नागरिकांनी विद्यमान व्यवस्थेविरोधात आणि माजी नगरसेवकांबद्दल तीव्र संताप व्यक्त केला असून, स्थानिक पातळीवर प्रभागात अनेक नागरी समस्यांचा डोंगर उभा असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे, २०१७ मध्ये निवडून आलेल्या काही माजी नगरसेवकांना आगामी निवडणुकीत सत्ताविरोधी वातावरणाचा अँटी-इनकम्बन्सी फॅक्टरचा मोठा धक्का बसण्याची दाट शक्यता आहे.

आर आर सी च्या या सर्वेक्षणात एक महत्त्वाची आणि सकारात्मक बाब दिसून आली, ती म्हणजे नागरी प्रश्नांविषयी नागरिकांमध्ये उत्कृष्ट जागरूकता निर्माण झाली आहे. जर प्रभागात अपेक्षित विकासकामे झाली नसतील, तर कोणतीही भीती किंवा दडपण न ठेवता मतदार आपले स्पष्ट आणि परखड मत मांडत आहेत. मतदारांची ही जनशक्तीची जाणीव संबंधितांसाठी आत्मपरीक्षण करणारी आहे.

या जनमत चाचणीचा उद्देश केवळ समस्या दाखवणे हा नसून, या समस्यांवर तातडीने तोडगा काढला जावा आणि त्या कायमस्वरूपी सुटाव्या , हा आहे. २०१७ पासून प्रशासकीय कारभारातून निवडणूक प्रक्रिया थांबली होती. आता नव्याने लोकशाही मार्गाचा आरंभ होत आहे. त्यामुळे, यापुढे तरी नागरिकांच्या मूलभूत समस्या युद्धपातळीवर सोडवणे अत्यावश्यक आहे. कारण, 'ये रे माझ्या मागल्या' असे होणे कुणाच्याही हिताचे नाही. प्रशासकीय राजवट संपुष्टात येऊन, जनमताने निवडलेली लोकशाही व्यवस्था पुन्हा प्रस्थापित व्हावी, या आशेने होणारी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आणि दिशादर्शक ठरणार आहे.

### मत चोरी सोडा उमेदवार चोरणार

मतचोरीची चर्चा राजकीय पातळीवर होत असताना उमेदवार चोरीच्या घटना पुढील काही दिवसात अकोल्यात दिसणार आहे. त्यामुळे या वेळी सर्वच राजकीय पक्ष तगड्या उमेदवारांना आपल्या पक्षात घेण्यासाठी अग्रेसर असून मतचोरी हा मुद्दा इलेक्शन च्या शेवटच्या दिवशी राहणार असून उमेदवार चोरीवर राजकीय पक्षांनी फोकस केला आहे. त्यामुळे आता उमेदवारच असा दमदार आणायचा भले ही तो विरोधातील तगडा उमेदवार असो तो विजयश्री खेचून आणेल या उद्देशाने सर्व राजकीय पक्ष कामाला लागले आहे.

# भुमी अभिलेख विभागाची कारवाईस टाळाटाळ

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अकोला :** भुमी अभिलेख विभागातील चौकशी संपली असून चौकशी अहवाल हा पुण्यातील कार्यालयात पोहचला आहे. चौकशी अहवालानुसार दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची गरज होती. पण, ही कारवाई टाळली जात आहे. पुण्यातील जमाबंदी आयुक्तांनी कारवाई करण्याचे आदेश स्थानिक प्रशासनाला दिले आहे. असे असताना स्थानिक प्रशासन मात्र या कडे दूर्लक्ष करत असल्याची ओरड आहे. आपल्याच अधिनस्थ कर्मचाऱ्यांवर कारवाईस वरिष्ठांची टाळाटाळ का असा प्रश्न निर्माण झाला आहे.




त्याच बरोबर मौखिक आदेशाने अनेकांना अडचणीत आणले आहे. असे असताना आता कनिष्ठांवर कारवाईची शक्यता वाढली आहे. पण, वरिष्ठ कारवाई टाळत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे.

उपअधीक्षक पंकज पवार यांच्या निलंबनानंतर झालेल्या चौकशीत अनेक प्रकरणांचा उलगडा झाला असून असे असताना आता गैरप्रकार करणाऱ्या कनिष्ठांवर कारवाई तत्काळ होण्याची गरज आहे. पण, ती कारवाई टाळण्यामागे अदृश्य शक्तींचा हात असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# वणीत पत्रकाराची आत्महत्या

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**यवतमाळ :** जिल्ह्यातील वणी येथील पत्रकाराने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास उघडकीस आली.



रवी ढुमणे (वय ५५) असे आत्महत्या केलेल्या पत्रकाराचे नाव आहे. वणी येथील नांदेपेरा बायपास रोडवरील विद्या नगरी चामाटे ले-आऊट येथील त्यांच्या निवासस्थानी ही घटना घडली. सकाळी सुमारे १० वाजता कुटुंबीयांनी खोलीचा दरवाजा उघडला नसल्याने आत जाऊन पाहिले असता, त्यांनी खिडकीच्या गजाला दोरी बांधून गळफास घेतल्याचे दिसले. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

# भाजपच्या चार पदाधिकाऱ्यांची सहा वर्षांसाठी हकालपट्टी

प्रतिनिधी १५ डिसेंबर



**मूर्तिजापूर :** नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षशिस्त मोडत अधिकृत उमेदवारांविरुद्ध उमेदवारी दाखल करणे, प्रचार करणे पक्ष विरोधी कारवायांमध्ये सहभागी होणे व पक्षाच्या विचारांची गद्दारी केल्याचा ठपका ठेवत बंडखोरी करणाऱ्या एका उमेदवारासह तीन पदाधिकाऱ्यांवर भारतीय जनता पक्षाने सहा वर्षांसाठी हाकालपट्टी केल्याची कारवाई केल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

काल १४ डिसेंबर रोजी भाजपचे जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांनी कमलाकर गावंडे (मंडळ कार्यकारिणी उपाध्यक्ष), अमोल पिंपळे ( भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष) तथा बंडखोरी करून पक्षाने दिलेल्या उमेदवारा विरोधात उमेदवार, श्रीकांत रामेकर ( भाजप युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष) आणि नितीन भटकर ( नमामि गंगे अभियान प्रमुख) या चार पदाधिकाऱ्यांवर पुढील सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करून हकालपट्टी केल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पक्षशिस्त भंग करणाऱ्यांबाबत कोणतेही सहानुभूती न दाखवण्याचा निर्धार पक्षाने स्पष्ट केला आहे. दरम्यान, पक्षातील कुठल्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्याने पक्षविरोधी भूमिका घेतल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे सूचनाही जिल्हाध्यक्षांनी केले आहेत. मात्र मूर्तिजापूर शहरात अधिकही भाजप चे पदाधिकारी आहेत, की ज्यांनी पक्षाने दिलेल्या अधिकृत उमेदवारा विरोधात स्वतः च उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यातीलच प्रभाग १२ व १ मधील उमेदवार मग त्यांच्यावर देखील कारवाई होईल का...? अथवा या कारवाईत त्यांचे नाव का नसावेत..? त्यांना जर भाजप सहानुभूती दाखवत असेल तर या पदाधिकाऱ्यांवर अन्याय नव्हे का..? अशा विविध चर्चा शहरात रंगत आहेत.

# नवीन वर्षात महागाईचा झटका !

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**नवी दिल्ली :** देशातील ग्राहकांसाठी नवीन वर्षाची सुरुवात महागाईचा मोठा झटका घेऊन येण्याची शक्यता आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वाढत्या मागणीमुळे जगभरात निर्माण झालेली चिप्सची टंचाई आणि डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची झालेली ऐतिहासिक घसरण, या दुहेरी कारणामुळे जानेवारी २०२६ पासून टीव्ही, स्मार्टफोन, लॅपटॉप आणि कार यांसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. कंपन्यांनी दिलेल्या संकेतनुसार, या वस्तूंच्या किंमतीत किमान ४ ते ५ टक्क्यांनी वाढ होईल, तर परिस्थिती अशीच राहिली तर ही दरवाढ १० टक्क्यांपर्यंत जाण्याची भीती व्यक्त होत आहे. एआय चिपच्या किंमती ५०० टक्क्यांनी वाढल्या आहेत. सध्या जागतिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजन्ससाठी वापरल्या जाणाऱ्या 'हाय-बँडविड्थ मेमरी' चिप्सची मागणी प्रचंड वाढली आहे. या मागणीमुळे अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सामान्य मेमरी चिप्सच्या पुरवठ्यात मोठी घट झाली आहे. अहवालानुसार, गेल्या काही महिन्यांत मेमरी चिप्सच्या किंमतीत तब्बल ५०० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. या वाढीव खर्चाचा बोजा कंपन्या थेट ग्राहकांवर टाकणार आहेत.

### रुपयाचे ऐतिहासिक अवमूल्यन

◆भारतीय रुपयाने ९० रुपये प्रति डॉलरचा टप्पा ओलांडला आहे. टीव्ही, स्मार्टफोन आणि लॅपटॉपसारख्या वस्तूंसाठी लागणारे 'ओपन सेल', सेमीकंडक्टर चिप्स आणि मदरबोर्ड यांसारखे ७० टक्क्यांहून अधिक घटक आयात करावे लागतात. रुपया कमजोर झाल्यामुळे आयातीचा खर्च प्रचंड वाढला आहे, ज्यामुळे उत्पादनाची एकूण किंमत वाढली आहे. या दरवाढीमुळे, सरकारने अलीकडेच ३२ इंच किंवा त्याहून मोठ्या टीव्ही स्क्रीनवर जीएसटी दर २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणून ग्राहकांना दिलेली दिलासादायक सवलत आता फिकी पडण्याची शक्यता आहे.

# दोन ग्रामपंचायत अधिकारी निलंबित; 13 'रडार'वर

## ♦ जिल्हा परिषदेच्या सीईओंचा आदेशाने उडाली खळबळ

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अकोला :** सन २०२३-२४ या वर्षातील १५ वित्त आयोगाचे अभिलेख लेखापरीक्षण न करणाऱ्या दोन ग्रामपंचायत ग्रामसेवकांवर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी जि.प. सीईओ अनीता मेश्राम यांनी निलंबनाची कारवाई केली. याव्यतिरिक्त इतर १३ ग्रामसेवकांवर सुद्धा अशाच प्रकरणात कारवाईची शक्यता आहे. त्यामुळे याकडेही लक्ष लागले आहे.

प्रधान सचिवांची नाराजी सन २०२३-२४ च्या १५व्या वित्त आयोगाचे ऑडिट अद्यापपर्यंत सादर न झाल्याने संबंधित १५ ग्रामपंचायतींच्या कामकाजा संदर्भात राज्याच्या ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव यांनी नाराजी व्यक्त केली आहे. बाळापूर तालुक्यातील तामसी व शेळद येथील ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत नृपणारायन व बोडखा ता. पातूर येथील ग्रामपंचायत अधिकारी बी.बी. आढे या ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर उर्वरित १३ ग्रामपंचायत अधिकारी रडारवर आहेत. यामुळे निलंबनाची कारवाई १५व्या वित्त आयोगाचे सन २०२३-२४ या वर्षातील अभिलेख लेखापरीक्षण २९ ग्रामपंचायतींनी केले नाही. त्यासाठी जिल्हा परिषद सीईओंकडून १९, २० व २१ नोव्हेंबर रोजी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर सुद्धा ग्रामपंचायत आगर, कासली, शिवापूर-कासोद, वाडेगाव, उरळ बु., शेळद, तामसी, चोहोगांव, आलेगांव, शिर्ला अंधारे, तांदळी बु, पिंपळखुटा, चरणगांव, राहेर, बोडखा या १५ ग्रामपंचायतींनी अभिलेख रेकॉर्ड उपलब्ध करून दिले नाही.

# वयोवृद्ध रुग्णाला दवाखान्यातून हाकलले !

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अकोला :** पायाच्या उपचारासाठी गेलेल्या ६५ वर्षीय वयोवृद्ध महिलेला आणि त्यांच्या मुलाला डॉ. गजेंद्र रघुवंशी यांनी शिवीगाळ आणि अपमानास्पद वागणुक, धमकी दिली आणि त्यांना उपचार न करताच दवाखान्यातून बाहेर काढल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी राजकन्या ज्ञानेश्वर लाखे यांनी रामदासपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, डॉ. गजेंद्र रघुवंशी यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांखाली अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणात खुद्द पोलिस अधीक्षकांनी रामदास पेठ च्या पोलिस अधिकाऱ्यांना सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्याचा आदेश दिला असताना त्या आदेशाची अमलबजावणी होत नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पोलिस अधीक्षकांनी या प्रकरणात अधीक्षक कार्यालयात पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना बोलविल्यावर या प्रकरणात तपास करणाऱ्यांनी नापसंती व्यक्त केल्याची माहिती आहे. सरकारी रुग्णालयात नोकरी करत असताना खाजगी




प्रॅक्टिस कशी असा ही मुद्दा या निमित्त चर्चिला जात आहे.

राजकन्या लाखे या त्यांच्या पायाच्या दुखण्यावर डॉ. गजेंद्र रघुवंशी यांच्याकडे उपचारासाठी गेल्या होत्या. त्यांनी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी डॉ. रघुवंशी यांच्याकडे उपचार घेतले होते आणि त्यांना १५ दिवसांनी पुन्हा भेटण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार, १० डिसेंबर २०२५ रोजी लाखे त्यांच्या मुलासह, सचिन ज्ञानेश्वर लाखे यांच्यासह, संध्याकाळी ६.०० ते ६.३० च्या दरम्यान हॉस्पीटलमध्ये हजर होत्या. त्यांच्या मुलाने लँडलाईन नंबरवर फोन करून डॉक्टरांच्या भेटीसाठी नाव नोंदणी केली होती व त्यांना ६.३० वाजता येण्यास सांगण्यात आले होते. तक्रारीनुसार, त्यांचा नंबर लागल्यानंतर त्यांच्या मुलाने डॉ. गजेंद्र रघुवंशी यांना 'आत येऊ का सर?' असे विचारले असता, डॉक्टरांनी संतापून केबिनचा दरवाजा मुलाच्या व आईच्या अंगावर इजा होईल या दृष्टीकोनातून जोरात ढकलून बंद केला. तसेच, त्यांनी दोघांनाही अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली आणि हॉस्पीटलमधून बाहेर काढून दिले. डॉक्टरांना असे न करण्याचे विचारले असता, त्यांनी पुन्हा शिवीगाळ केली आणि अपमानास्पद वर्तन करून धमकी दिली. डॉक्टरांच्या या गैरवर्तवणुकीमुळे वयोवृद्ध महिलेला उपचारापासून वंचित रहावे लागले, ज्यामुळे त्यांच्या गुडघ्याच्या दुखण्यावर आणि मनस्थितीवर विपरीत परिणाम झाला आहे. तक्रारदार आणि त्यांचे कुटुंब या घटनेमुळे अतिशय मानसिक तणावात आले असून, ही घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये जतन झाली आहे आणि त्यांचा मुलगा व हॉस्पीटलमधील कर्मचारी साक्षीदार असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. डॉक्टरांनी वैद्यकीय व्यवसायाच्या वर्तणूक नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप तक्रारदार लाखे यांनी केला आहे.

# मेस्सी मैदानात, पण वानखडेवर आवाज सचिनचा!



प्रतिनिधी १५ डिसेंबर

**मुंबई :** अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलर लिओनेल मेस्सी सध्या भारत दौऱ्यावर असून कोलकाता आणि हैदराबादनंतर तो रविवारी मुंबईत आला. मुंबईत त्याने विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. यावेळी तो वानखेडे स्टेडियममध्येही पोहोचला, जिथे त्याला पाहण्यासाठी प्रचंड संख्येने चाहत्यांची गर्दी केली होती. वानखेडे स्टेडियममध्ये भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भारतीय फुटबॉल संघाचे दिग्गज सुनील छेत्री यांची उपस्थिती होती.



सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

## श्री. संत गाडगे महाराज पुण्यतिथी महोत्सवाचा शुभारंभ

**अमरावती:** प्रथम भजन पुष्प बालाजी महिला भजन मंडळ काटपुर धामणगाव येथील महिलांचे श्री. संत गाडगेबाबांचा पुण्यतिथी महोत्सवामध्ये सादर केलेलं भजनी मंडळ प्रमुख कल्पनाताई विलास महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला मंडळ सहभागी झाले आहेत पेटी मास्तर विलास भाकरे तर तबलावादक दिलीप बहादुरकर व तसेच त्यांच्या महिला



मंडळाचे प्रामुख्याने कल्पनाताई मोहल्ले, रेखाताई भाकरे, प्रेमाताई काळे, नीलिमा मले, अलका काळे, सिंधुबाई काळे, मीनाताई काळे, अंजू ताई काळे, रमाताई काळे, लताबाई काळे या सर्व महिला मंडळ सहभागी झालेले आज प्रथम दिवस भागवत शुभारंभ यजमानपद राहुल भरत रेडे, माधुरीताई रेडे यांच्या हस्ते कलास्थापना करण्यात आली.

# गोपालनगर अंडरपास प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

### ◆ नवनीत राणा यांच्या अथक प्रयत्नांना यश; मुख्यमंत्री यांनी केले स्काय वॉक साठी ५ कोटी रुपये मंजूर

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अमरावती :** माजी खासदार नवनीत राणा यांच्या पुढाकाराने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या विशेष सहकार्याने गोपालनगर येथील अंडरपासचे बांधकाम पूर्ण झाले आहे. जनतेच्या दीर्घकालीन मागणीची दखल घेत सुमारे ४५ कोटी रुपये खर्चून सुसज्ज अंडरपास उभारण्यात आला असून त्यामध्ये रस्ते, नाल्या व फुटपाथच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

हा अंडरपास १५ -१२-२०२५ सोमवारला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते यांच्या शुभहस्ते व




पालकमंत्री अमरावती यांचे प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करून जनतेसाठी खुला करण्यात येणार आहे.

तसेच गोपालनगर येथील स्कायवॉकसाठी माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. या सर्व विकासकामांसाठी माजी खासदार नवनीत राणा यांच्या अथक प्रयत्नातून मोठा निधी मंजूर करण्यात आला असून त्यामुळे नागरिकांना सुरक्षित व सोयीस्कर वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच अमरावती शहर व बडनेरा शहरातील असंख्य नागरिकांना पालकमंत्री यांचे शुभ हस्ते पी आर कार्ड वितरीत होणार असून यावेळी आमदार रवी राणा यांची प्रमुख उपस्थिती राहणार.

## महाराष्ट्राच्या स्वच्छतेचे आद्यजनक श्री संत गाडगेबाबा

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अमरावती:** स्वच्छतेचे महान पुजारी वैराग्यमुर्ती श्री संत गाडगेबाबांनी दिवसभर गांवे स्वच्छ केली आणि रात्री किर्तनाच्या माध्यमातून जनतेच्या मेंदुतील घाण साफ केली. ऐवढे अगाध कार्य करणारे महाराष्ट्राच्या स्वच्छतेचे आद्यजनक श्री संत गाडगेबाबा होत. अशी गाडगेबाबा महती सुश्री महेश्वरी देवी यांनी प्रथम पुष्प गुंफतांना विशद केली.



संत गाडगेबाबा

श्री. संत गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सवाला गाडगेबाबानगर येथे प्रारंभ झाला आहे. सप्ताहभर श्रीमद् भागवत कथा पठन सुश्री महेश्वरी देवी यांच्या अमृततुल्य वाणीतून होणार आहे. श्रीमद् भागवत कथा पठनात महेश्वरी देवी म्हणाल्या, भागवत कथा हि सर्व व्यथा दुर करते. आधुनिक काळात धावपळीचे जिवन जगतांना माणसाला सत्संग आवश्यक आहे. यासाठी बाबांच्या समाधीस्थळी हा भागवत कथेचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. आदी विषयांवर महेश्वरी देवी यांनी हात घातला. सपुर्ण परिसर गोपाला गोपाला देवकीनंदन गोपालाच्या गजरात निनादून गेला.

## डॉ.मिर्झा बेग एकात्मतेचे प्रतीक-शंकरबाबा पापळकर

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अमरावती:** प्रसिद्ध वऱ्हाडी विनोदी कवी डॉ मिर्झा रफी अहमद बेग हे हिंदू मुस्लिम ऐक्य व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते. दुःखाने भरलेल्या जगात त्यांनी आनंद वाटला. त्यांची व माझी भेट झाली नाही याचे दुःख आहे .अशा आशयाचे उद्गार पद्मश्री, डिलीट महान समाजसेवक शंकरबाबा पापडकर यांनी काढले.

जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद व मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय यांच्या वतीने वतीने विमलाबाई देशमुख महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या डॉ मिर्झा यांच्या श्रद्धांजली सभेत ते अध्यक्ष म्हणून बोलत होते.

याप्रसंगी डॉ. सुभाष सावरकर, डॉ. स्मिता देशमुख डॉ. दिलीप काळे भोजराज चौधरी, जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ जिल्हाध्यक्ष डॉ.राजवलीकर उपस्थित होते.




प्रसिद्ध वऱ्हाडी कवी डॉ. राजा धर्माधिकारी, गौतम गुडधे, राजेश महल्ले डॉ.राज यावलीकर ,राजिव शिंदे गझलकार खलिश अनंत नांदुरकर, नितीन भट आदींनी आपल्या कविता गाऊन डॉ. मिर्झा यांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी डॉ. पृथ्वीसिंग राजपूत ,डॉ शोभा रोकडे, प्राचार्य दिलीपसिंह खांबरे, रंजना मामर्डे , पुरुषोत्तमराव गावंडे , संजय महल्ले, वर्षा धाबे, , राजेश मिरगे, सुनिता तायडे, शोभना देशमुख ,सय्यद मुजीब, आलम ,छाया पाथरे, अरविंद उतखेडे, गणेश खडके ,असलम अहमद खान ,चंद्रभूषण किल्लेदार ,मोहम्मद अफसर दिवाकर देशमुख, कल्पना विघे, योगिता पिंजरकर शरद गावंडे, इत्यादींनी श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी सुनील यावलीकर ,जी.बी. देशमुख ,संजय खडसे, प्राचार्य दादाराव दाभाडे, कुमार बोबडे मनोज तायडे ,नेहा भटकर, प्रदीप चौधरी, नीलिमा भोजने, माधव पांडे ,रेषा अकोटकर सुभाष पाटील धोटे, प्रतिभा पिटके ,राणी नागापुरे, सिमरेला देशमुख, प्रा.काकडे , कुंदन राऊत ,संजय खडसे आदी मंडळी उपस्थित होती. विविध मान्यवरांनी डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या कवितेचे ,त्यांच्या स्वभावाचे विविध गुणविशेष स्पष्ट केले. अत्यंत भावपूर्ण असा हा कार्यक्रम झाला.

श्रद्धांजली सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ.सतीश तराळ यांनी केले. तर आभार प्रदर्शन मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ.मंदा नांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राणी नागापुरे, गणेश खडके, सिमरेला देशमुख, कुंदन राऊत राज यावलीकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी लोककवी विठ्ठल वाघ लोकनेते उल्हास दादा पवार आदींनी शुभेच्छा पाठवल्या होत्या श्रद्धांजली सभेला अमरावतीकर नागरिकांची, कवी, लेखकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## श्री. संत गाडगे महाराज समाधी मंदिर येथे रोज मिष्ठान्न अन्नदान

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अमरावती :** गाडगे बाबा नगर श्री. संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती या संस्थेचे विश्वस्त संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी रोज दुपारी बारा वाजता बाबांच्या पुण्यतिथी उत्सव निमित्त गोड भोजनदान करण्यात येणार असून आज पहिला दिवस कै. नामदेवराव रोडे यांच्या स्मरणार्थ रोडे परिवार राधानगर अमरावती पुरणपोळी १५ डिसेंबरला स्वर्गीय दिगंबर आप्पाजी कुऱ्हे यांच्या स्मरणार्थ कुरे परिवार सात खिराडी अमरावती, १६ डिसेंबर संतोष भुवन तर्फे गुप्ता



यांच्या यांच्या स्मरणार्थ तर स्वर्गीय शेषराव गजाननराव सवाई यांचे स्मरणार्थ स्वर्गीय प्रमिलाबाई सवाई तर्फे सवाई परिवार गाडगेबाबा नगर तर १८ डिसेंबरला कै. गोविंदराव अच्युतराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांचे स्मृती प्रित्यर्थ प्रतिभा देशमुख समता नगर मूर्तिजापूर, प्रशांत देशमुख दादर मुंबई यांच्यातर्फे १९ डिसेंबरला श्रीमती विजयाताई रामरावजी मोहोळ राधानगर अमरावती वीस डिसेंबरला स्वर्गीय सुरेंद्र जी झुंबर व स्वर्गीय विनोद भुम्बर स्मृती पिक्चर सौरभ भुंबर यांच्यातर्फे गाडगेबाबा नगर अमरावती तर्फे मिस्टन्न अन्नदान होणार आहे तरी सर्व भाविक भक्तांनी पुण्यतिथी महोत्सवाचा उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख व्यवस्थापक प्रकाश महात्मे यांनी केले आहे.

## चांडोळा येथे अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारावे

### ◆ उमेश चव्हाण यांची मागणी

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**दर्यापूर:** अखिल भारतीय मातंग संघाचे ने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देऊन दर्यापूर तालुक्यातील चांडोळा या गावासाठी महत्त्वाच्या मागण्या अखिल भारतीय मातंग संघ आणि विविध मातंग समाजाच्या संघटनांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित दादा पवार यांना दिले असून दर्यापूर तालुक्यातील चांडोळ (र्ण्ह्दथ्) गावाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन दिले.

या निवेदनामध्ये प्रामुख्याने तीन प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत

: प्रमुख मागण्या सभागृहासाठी निधी: चांडोळ येथे साहित्यरत्न डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने भव्य सभागृह बांधण्यासाठी ३५,००,००० (पस्तीस लाख) रुपयांचा निधी त्वरित उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच रस्ते आणि पूल बांधकाम: चांडोळा ते दहीहांडा या महत्त्वाच्या रस्त्याचे बांधकाम त्वरित पूर्ण करण्यात यावे.शहानूर नदीवरील पुलाची आवश्यक व्यवस्था (ॅगुण्दहूेल्म्दह) करण्यात यावी, ज्यामुळे पावसाळ्यात होणारी गैरसोय दूर होईल. मुख्य प्रवेशद्वार: गावाच्या मुख्य प्रवेशद्वाराला क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांचे नाव देण्यात यावे. उपस्थित पदाधिकारी: उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन सादर करताना अखिल भारतीय मातंग संघाचे आणि लहुजी शक्ती सेनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. संघटना जिल्हाध्यक्ष, अमरावती . उमेश चव्हाण अखिल भारतीय मातंग संघ

पदाधिकारी मोहन अंभोरे लहुजी शक्ती सेना पदाधिकारी दिनेश भाऊ चव्हाण लहुजी शक्ती सेना ,पदाधिकारी गवई ,लहुजी शक्ती सेना उपाध्यक्ष बंडु भाऊ इंगळे , लहुजी शक्ती सेना अखिल भारतीय मातंग संघाने सादर केलेल्या या निवेदनामुळे दर्यापूर तालुक्यातील चांडोळ गावाच्या विकासाला गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री महोदयांनी या मागण्यांवर सकारात्मक विचार करून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली.

## नायलॉन मांजाची विक्री केल्यास होणार कारवाई

सुरज बोराखडे १५ डिसेंबर

**खामगाव :** खामगाव मकर संक्रांती निमित्त पतंगोत्सव साजरा करण्याची जुनी परंपरा आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण पतंग उडविण्याचा आनंद घेतात; पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे. पूर्वी पतंग उडविण्यासाठी दोऱ्याचा किंवा घरगुती मांजा चा वापर केला जायचा. आता मात्र पतंग उडविण्यासाठी चिनी, तसेच नायलॉन मांजाचा वापर केला जात असल्याने पक्ष्यां बरोबरच मानवी जीवनावर देखील 'संक्रांत' येत आहे. पतंग काटाकाटीच्या खेळात दरवर्षी शेकडो पक्षी बळी पडत असून, नागरिक देखील गंभीर जखमी होत असल्याचे



प्रकार सातत्याने समोर येत आहेत.

नायलॉन मांजा चे दुष्परिणाम लक्षात घेता या मांजा वर बंदी घालण्यात आली आहे. खामगावात नायलॉन मांजा वर बंदी असतानाही या मांजा ची विक्री केली जाते. मागच्या वर्षी मांजा मुळे एक मेकॅनिक व खुप नागरिक गंभीर जखमी झाले होते. दुचाकीवरून जात असताना यहा घटना घडली होती, त्याचवेळी हा नायलॉन मांजा काही पक्ष्यांच्या जिवावर उठत आहे. गत काही वर्षांत काहींना तर मांजामुळे कायमचे अपंगत्व आले आहे, तर काहींचा जीवही गेला आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, मांजावर बंदी आणली गेली असली तरी, त्याचा वापर होत आहे.

**खामगाव नगरपालिका प्रशासनाचा 'वॉच'**

खामगाव शहरात होणाऱ्या नायलॉन मांजा विक्रीवर नगरपालिका प्रशासना सोबतच शहर आणि शिवाजीनगर पोलिसांनी लक्ष देणे गरजेचे आहे; मात्र कारवाईत शिथिलता मिळत असल्याने खामगावात नायलॉन मांजा, चिनी मांजा किंवा चिनी दोर, नायलॉन (सिंथेटिक) कृत्रिम किवा बारीक चुरा केलेली काच, धातू किंवा अन्य कोणताही तीक्ष्ण पदार्थ यांनी अवगुंठित केलेला धागा, मांजा मोठ्या प्रमाणात विकला जात आहे. अशा विक्रेत्यांवर वॉच ठेवून राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाच्या निर्देशानुसार कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

**शहर पोलिसांचा चांदमारी भागात छापा**

पोलिसांनी १४ डिसेंबर रोजी जित जगदीश गुप्ता (वय २५, रा. चांदमारी घरकुल परिसर, खामगाव) याच्या दुकानावर छापा टाकला. या कारवाईदरम्यान सुमारे २,५०० रुपये किमतीचा नायलॉन मांजा आढळून आला. हा नायलॉन मांजा पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी जित जगदीश गुप्ता याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२५ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम १५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## रामतीर्थ फाट्यावर थरार...!

### ◆ धावत्या कारला भीषण आग; चालक बचावला

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**दर्यापूर :** दर्यापूर तहसीलमधील रामतीर्थ फाट्याजवळ रविवारी (दि. १४) सायंकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास धावत्या कारला अचानक आग लागल्याची खळबळजनक घटना घडली. प्रसंगावधान राखत चालकाने तत्काळ कारबाहेर उडी घेत स्वतःचा जीव वाचवला. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली; मात्र कार पूर्णपणे जळून खाक झाली. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कारचालक हा अकोला जिल्ह्यातील कापसी येथील रहिवासी असून तो दर्यापूर तालुक्यातील जैनपूरी येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी जात होता. प्रवासादरम्यान अचानक शॉर्ट सर्किट झाल्याने कारला आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केल्याने कार पूर्णतः जळून खाक झाली. घटनेची



माहिती मिळताच दर्यापूर नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. वृत्त लिहिण्यापर्यंत आग पूर्णतः आटोक्यात आली होती. या घटनेमुळे रामतीर्थ फाटा परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## तोतया पोलिसांनी दांपत्याकडून दोन लाख किमतीचे सोन्याचे दागिने उडविले

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**खामगाव :** शहरातील बालाजी नगर येथे राहनाऱ्या घनोकार दाम्पत्यांना तहसील कार्यासमोर तोतया पोलिसांनी दोन लाख किमतीच्या सोन्याचे दागिने लुटून गंडविल्याची घटना घडली आहे. या घटनेने नांदुरा शहरात सर्वत्र खळबळ उडाली आहे, सविस्तर वृत्त असे की शहरातील सेवानिवृत्त शिक्षक अनिल हरिभाऊ धनोकार हे १३ डिसेंबरला दुपारी दीड च्या सुमारास आपल्या पत्नीसह सत्संग एकूण मोटार सायकलने घरी येत असतांना दोन अनोळखी ईसम गाडीसमोर आले आणि पोलीस असल्याचे सांगत त्यापैकी मोटारसायकल चालवित असलेल्याचे अंगात हिरवट रंगाचे जॅकेट गोरा वर्ण व जाड बांधा असलेला वय अंदाजे ४० वर्ष व त्याचे मागे बसलेला सडपातळ बांधा व पाठीवर काळी बॅग असलेला वय अंदाजे ३५ वर्ष असलेले फिर्यादीस हात दाखवुन थांबविले व त्यांचे जवळ येवुन घनोकार यांना म्हणाले की, आम्ही पोलीस असुन नांदुरा शहरामध्ये चो-या होत असुन तुम्ही तुमचे अंगावर सोन्याचे दागीने घालुन जात आहात. तुम्ही तुमचे अंगावरील सोन्याचे दागीने काढा व तुमचे रुमालात बांधा व थैलीमध्ये घेवुन जा. असे म्हटल्याने घनोकार यांनी त्यांचे हातात असलेले दोन जुन्या वापरत्या सोन्याच्या अंगठ्या वजन अंदाजे २० ग्रॅम प्रती ग्रॅम ५०,०००/- रुपये प्रमाणे कि.अं.१,००,०००/-रुपये तसेच गळ्यात असलेली जुनी वापरती साखळी वजन अंदाजे २० ग्रॅम किमती प्रती ग्रॅम ५०,०००/- रुपये प्रमाणे १,००,०००/- रुपये असे एकुण २,००,०००/-रुपये काढुन रुमालात बांधत असतांना नमुद आरोपीनी रुमाल त्यांचे हातात घेवुन फिर्यादीची नजर चुकवुन फिर्यादीची सोन्याची साखळी व दोन अंगठया त्याचे हातात ठेवुन हातचलाखीने रुमालामध्ये फक्त पाकीट बांधुन रुमालाची बुचडी फिर्यादीचे हातात देवुन फसवणुक केली त्यावरून घनोकार यांनी नांदुरा पोलीस स्टेशन येथे ६६७/२०२५ कलम ३१८(४),३(५) आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोउपनि घाटोळ सा. यांचेकडे देण्यात आला आहे.

## धुक्यात अपघात टाळण्यासाठी तरोडा कसबा टोल प्लाझावर वाहनांवर रेडियम टेप उपक्रम

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**खामगाव :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथून जवळ असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील तरोडा कसबा टोल प्लाझा येथे धुक्याच्या काळात होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी एक महत्त्वपूर्ण सुरक्षितता उपक्रम राबविण्यात आला. मेसर्स स्कायलार्क इन्फ्रा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने टोल प्लाझावरून जाणाऱ्या वाहनांच्या मागील बाजूस रेडियम टेप लावण्यात आले. धुक्यामुळे दृश्यमानता कमी होत असल्याने अनेक वेळा मागून येणाऱ्या वाहनचालकांना पुढील वाहनाचा अंदाज येत नाही. मात्र, रेडियम



टेपमुळे धुक्यातही वाहन स्पष्टपणे दिसून येणार असल्याने अपघातांची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाच्या वेळी जनरल मॅनेजर योगेश सिंग राजपूत, झोनल हेड भूषण बागुल, प्लाझा मॅनेजर अमित गंथल, असिस्टंट प्लाझा मॅनेजर हेमेंद्र सिंग यांच्यासह एचआर अनिल कुमार, आयटी देवांशू दुबे, व्हॅलिडेटर तरुण सिंग, शिफ्ट इन्चार्ज जयेश चौधरी, संदीप सिंग तसेच टोल प्लाझावरील सर्व कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रस्ते सुरक्षिततेच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार असून वाहनचालकांनीही सुरक्षित वाहतुकीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

## एमडी डोरमेट्रोलॉजी परीक्षेत डॉ. विवेक चौव्हाण उत्तीर्ण

**अकोला:** उत्तर प्रदेशच्या मथुरा येथील के डी वैद्यकीय महाविद्यालयात उच्च वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या महानगरातील डॉ विवेक प्रविण चौव्हाण याने डॉरमेट्रोलॉजी, वेनोरोलॉजी व लॅप्रोलॉजी या विषयात एमडी परीक्षा उत्तीर्ण करून आपली प्राविण्यता प्रदर्शित करीत परीक्षा उत्तीर्ण केली. एमडीच्या या परीक्षेत तज्ञ विषया समवेतच डॉ विवेक चौव्हाण हा अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय विद्यापीठ लखनऊ मधून चांगल्या अंकाने उत्तीर्ण झाला.

## बोर्डी येथे दमानी नेत्र रुग्णालयाच्या वतीने नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर



वि. प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अकोट:** बोर्डी येथे दमानी नेत्र रुग्णालय, अकोला यांच्या वतीने संवेदना ग्रुप, अकोला व इनर व्हील क्लब, अकोला यांच्या सहकार्याने भव्य नेत्र तपासणी तसेच मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराच्या प्रारंभी श्री. नागास्वामी महाराजांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आशिष शामराव आपोतीकर हे होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात त्यांनी समाजासाठी अशा आरोग्य शिबिरांचे महत्त्व विशद केले.

या शिबिरामध्ये एकूण २२० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर मोतीबिंदू निदान झालेल्या ६२ रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेसाठी तारीख देण्यात आली आहे.

कार्यक्रमास सभापती शुक्ला, अजय देशमुख, सुनील सरोदे, डॉ. इंगोले, राजू मुद्दगवाल, नरेंद्र कोंडे, तुळशीराम इस्तापे, आनंदराव लाहोरे, रमेश खिरकर, डॉ. ढोकणे, डॉ. महल्ले, सुभाष खिरकर, ज्ञानेश्वर कडू, नंदकिशोर ताडे, वल्लभ तराळे, कुंदन देशमुख, प्रणव देशमुख, आदित्य देशमुख, जीवन देशमुख, सक्षम देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश गायकवाड यांनी केले तर शेवटी दिनेश देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## २३वे जैन तीर्थंकर श्री पार्श्वनाथ प्रभुंचा जन्मोत्सव साजरा



प्रतिनिधी १५ डिसेंबर

**अकोला:** २३ वे तीर्थंकर श्री पार्श्वनाथ प्रभु यांचा जन्म महोत्सव पौषदशमीला उत्साही वातावरणात साजरा केला जातो. अंतरीक्ष पार्श्वनाथ मंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले झाले तेव्हापासून जैन समाजात चैतन्य आले आहे. भारतातून दर्शना करता भाविकांची रेलचेल वाढली आहे. अकोला वरुन जाणेयेणे वाढले आहे. जैन आचार्य ही पदवी परमहंस विजयजी महाराज यांना नुकतीच श्री. अंतरिक्ष पार्श्वनाथ तीर्थ, शिरपूर येथे भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करून बहाल करण्यात आली आहे. श्री. आदेश्वर जैन मंदीर, गांधी चौक येथील अंतरीक्ष पार्श्वनाथ प्रतिमेची आकर्षक सजावट श्री. आदेश्वर जैन मंदिर येथील श्री. जीनराज आंगी ग्रुप च्या सदस्या सौ. प्रियंका जैन आणि सौ. पुजा रामानी यांनी केली होती.

# नायगाव येथे भव्य, सर्व सोयींनी युक्त अत्याधुनिक सभागृहाची उभारणी





प्रतिनिधी १५ डिसेंबर

**◆ आर्किटेक्ट सोहेल खान आणि नायगाव डेव्हलपमेंट टीमचे देदीप्यमान यश**

**अकोला:** नायगाव परिसरात दीर्घ काळापासून मंगलकार्ये, विशेषतः लग्न समारंभांसाठी एका सुसज्ज सभागृहाची तीव्र आवश्यकता होती. ही महत्त्वाची गरज लक्षात घेऊन प्रसिद्ध आर्किटेक्ट सोहेल खान आणि नायगाव डेव्हलपमेंट टीम गेल्या चार वर्षांपासून अविरत प्रयत्नशील होते. यासाठी आमदार साजीद खान पठाण यांनी मोलाची मदत केली.

महानगरपालिका शाळा क्रमांक ७ च्या आवारात बांधण्यात येत असलेल्या या अत्याधुनिक फंक्शन हॉलच्या बांधकामाचा भव्य शुभारंभ समारंभ नुकताच संपन्न झाला. या सामुदायिक फंक्शन हॉलच्या बांधकामासाठी सुमारे ५० लाख रुपयांचा मोठा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा फंक्शन हॉल लवकरात लवकर बांधून पूर्ण होईल, ज्यामुळे नायगावच्या जनतेला लग्न, निकाह आणि इतर महत्त्वाच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी अत्यंत मोठी आणि उत्तम सोय उपलब्ध होणार आहे.

प्रसिद्ध आर्किटेक्ट सोहेल खान आणि नायगाव डेव्हलपमेंट टीम यांच्या या प्रशंसनीय प्रयत्नांची गंभीर दखल घेऊन, सन्माननीय आमदार साजीद खान पठाण यांनी या महत्त्वाकांक्षी कार्यासाठी तत्काळ निधी मंजूर करून मोलाचे सहकार्य केले. आज नायगाव, प्रभाग क्रमांक १ मध्ये जनतेच्या उत्स्फूर्त उपस्थितीत आमदार साजीद खान पठाण यांच्या करकमलांनी सभागृह बांधकामाचा ऐतिहासिक शुभारंभ पार पडला. उद्घाटन समारंभानंतर, आमदार साजीद खान पठाण यांच्या ऋणनिर्देशासाठी नायगाव डेव्हलपमेंट टीम आणि आर्किटेक्ट सोहेल खान यांच्या वतीने अत्यंत उत्साहाने स्वागत आणि आभार कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन करण्यात आले होते. या गौरवशाली प्रसंगी नायगाव डेव्हलपमेंट टीमचे सर्व कार्यकर्ते, सोहेल खान यांचे समर्थक आणि मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक सगळे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.



**हिवरखेड:** लेंडी नाला पुलाखाली अशा प्रकारे जलकुंभी वाढली आहे. यामध्ये अनेक विषारी प्राणी आसरा घेत असतील. येथील रहिवाशांना तर धोकाच आहे. याकडे कोण लक्ष देणार.
**(छाया: अर्जुन खिरोडकार हिवरखेड)**

## प्रा. निलेश पाकदुने आचार्य पदवीने सन्मानीत

प्रतिनिधी १५ डिसेंबर



**पातूर:** स्थानिक तुळसाबाई कावल माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय येथे कार्यरत असलेले प्रा. निलेश पाकदुने यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीची विद्यावाचस्पती ही पदवी बहाल करण्यात आली आहे. याबाबतचे नोटिफिकेशन त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. मानव विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयात ठआदिवासी बारेला जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यासठ या विषयावर त्यांनी आपला शोध प्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. यासाठी त्यांना प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे सर, मराठी विभाग, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. सातपुडा पर्वत रांगांमध्ये असलेल्या आदिवासी बारेला जमातीच्या लोकसाहित्याचा महत्त्वाचा दस्तऐवज या प्रबंधाच्या निमित्ताने तयार झाला आहे.

## शाहबाबू विद्यालयात विज्ञान प्रदर्शनी

प्रतिनिधी १५ डिसेंबर



**आलेगाव :** येथील शाहबाबू विद्यालय मध्ये विज्ञान प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी १०५ प्रतिकृती सादर केल्या.. प्रदर्शनीचे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुनील फाटकर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाचे कार्यकारी अधिकारी सैय्यद इसहाक राही यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदर्शनी झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष जलालोद्दीन जुलफोद्दीन होते. तर प्रमुख अतिथी म्हणून इरफानोद्दीन, मोहम्मद जफर माजी पर्यवेक्षक, मो मुजीब, मो जावेद, मो साबीर, सैय्यद जुनेद, मो युनूस, रेहानूलहक, शेख जाबीर, शेख मुक्तार, वनाधिकारी होते. शाळेचे सचिव ईसहाक राही यांनी विज्ञान प्रदर्शनीवर मार्गदर्शन केले. प्राचार्य मोबीन शेख यांनी मत व्यक्त केले. तर सूत्र संचालन शिक्षक सलीम खान यांनी केले तर मो. समीन यांनी आभार व्यक्त केले.

## स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची निसर्गाच्या सानिध्यात भेट

प्रतिनिधी १५ डिसेंबर



**अकोला:** स्थानिक तुकाराम चौकातील स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक मराठी शाळेतील विद्यार्थ्यांची सहलरुपी क्षेत्रभेट महान, काटेपूर्णा अभयारण्य, वाघागड व बार्शीटाकळी येथे नेण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम महान येथील काटेपूर्णा नदीवरील धरणाला भेट दिली असता धरणावरील कर्मचाऱ्यांनी धरणाची क्षमता, पाणलोट क्षेत्र, काटेपूर्णा नदीचा उगम व संगम याची माहिती दिली, त्यानंतर महान येथील जलशुद्धीकरण केंद्र येथील कर्मचाऱ्यांनी जलशुद्धीकरण केंद्र दाखवुन जलशुद्धीकरणाची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली तसेच अकोला शहराला होत असलेल्या पाणीपुरवठ्याच्या प्रक्रियेची माहिती दिली. महाननंतर काटेपूर्णा अभयारण्याला भेट दिली असता तेथील वन्यजीव व वृक्षांची माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. तर वाघागड येथे विद्यार्थ्यांनी अध्यात्मिक ज्ञान प्राप्त केले. शेवटी बार्शीटाकळी येथील प्रसिद्ध खोलेश्वर मंदिर येथे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांनी पुरातन मंदिराची माहिती घेतली. यावेळी मुख्याध्यापिका मनीष उंबरकर, मुख्याध्यापक अविनाश मते यांच्यासह शिक्षक जयेश चोपडे, सोनाली मानकर, आशा डाबेराव, पद्मावती लंगोटे, कु.हर्षा सोळंके, मनीष गावंडे तर शिक्षकेतर कर्मचारी मनोज बनसोड उपस्थित होते.

## वैष्णवी लव्हाळे हिला ॲथलेटिक्स मध्ये रजत पदक

प्रतिनिधी १५ डिसेंबर



**अकोला:** मूळ अकोल्याची वैष्णवी लव्हाळे हिने रामराव देशमुख आर्ट अँड इंदिराजी कपाडिया कॉलेज बडनेराच्या वतीने सहभागी होऊन नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात झालेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवमधे १०० मीटर रिलेमध्ये सिल्वर पदकाची कमाई केली. येत्या जानेवारी महिन्यात होणा-या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी बेंगलोर येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. या अगोदर वैष्णवी लव्हाळे हिने धावण्याच्या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रात वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये सहभाग नोंदवत प्रसिद्धी मिळवली. अकोल्याची बुलेट ट्रेन म्हणून प्रकाश झोतात आली. कमी वयात झेप घेण्याचे स्वप्न तिने साकारले. याचे सर्व श्रेय तिच्या आईला ममता लव्हाळे यांना देते. तसेच तिचे प्रशिक्षक अतुल पाटील व गणेश मारके यांचे सुद्धा तिच्या यशामागे महत्त्वाची भूमिका आहे. येत्या काळात तिने देशाकडून खेळावे. आशिया, ओलिंपिक पर्यंत मजल मारावी अशी तिच्या आईची इच्छा आहे.

## स्मार्ट इंडिया हॅकाथॉन राष्ट्रीय स्पर्धेत अकोल्याच्या क्रिश शाहला विजेतेपद

प्रतिनिधी १५ डिसेंबर



**अकोला:** देशातील सर्वात प्रतिष्ठित नवोपक्रम स्पर्धांपैकी एक असलेल्या स्मार्ट इंडिया हॅकाथॉन च्या ग्रँड फायनलमध्ये अकोल्याचा क्रिश शाहला विजेतेपद मिळाले.

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. ही स्पर्धा भारत सरकार तर्फे राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येते. या स्पर्धेत क्रिश शाह आणि त्याच्या संघाने मुंबई येथे पार पडलेल्या उपांत्य फेरीत व नंतर कानपूरला झालेल्या अंतिम फेरीत प्रथम क्रमांकाने विजय मिळवून स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०२५ चे विजेतेपद पटकावले . १.५ लाख रुपयांचे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला . या स्पर्धेत देशभरातून जवळपास २६०० महाविद्यालयातील ८,५०,००० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. क्रिश हा तेल्हारा येथील सेठ बन्सीधर एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष अभिजीत शाह व डॉ. स्मिता शाह यांचा सुपुत्र आहे. क्रिशच्या या यशामुळे तेल्हारा, अकोला शहराचा गौरव वाढला आहे.

## ऐन मतमोजणीच्या तोंडावर महायुती पुन्हा फाटली.....?

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**मूर्तिजापूर:** स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमी दरम्यान ऐन मतमोजणी च्या तारखा जवळ जवळ येत असतानाच मूर्तिजापूर येथे भाजपा आणि शिवसेना शिंदे गट यांच्यातील वाद विकोपाला जात असल्याचे चित्र शहरात चर्चेचा विषय बनलाय.

मूर्तिजापूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये प्रभाग क्रमांक ९ (अ) मधील घडामोडी आता केवळ अंतर्गत वादापुरत्याच मर्यादित न राहता लोकशाहीच्या मुळावर घाव घालणाऱ्या गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात आरोपांतरीत व्यक्त होतांना पाहायला मिळत आहे. बनवट जात प्रमाणपत्र, उमेदवारी अर्ज दाखल करताना चुकीची वैयक्तिक माहिती आणि कागद पत्रातील स्पष्ट विसगती असतानाही उमेदवारी टिकून राहणे व निवडणूक लढणे म्हणजेच मतदाराचे उघडपने भूल केल्याचा गांभीर्यजनक आरोप भाजपाच्या प्रभाग क्रमांक ९ (अ ) मधील उमेदवार सौ. धनश्री शैलेश उर्फ बबलू भेलोंडे यांनी एका लेखी तक्रारी द्वारे राज्य निवडणूक आयुक्त, विभागीय आयुक्त, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मूर्तिजापूर यांच्या कडे शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार पूजा राजेश अरोरा यांच्या विरुद्ध केलाय, या वरूनतरी राज्यतील महायुती गटबंधन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अंतर्गत वादातून फाटल्याचे पाहायला मिळत आहे. तर २ डिसेंबर रोजी संपन्न झालेल्या मूर्तिजापूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक अंती मध्यरात्री शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सौ. पूजा अरोरा यांच्या भावाचे म्हणजेच लखन अरोरा व भाजपाचे राम जोशी, गुड्डू मारवाल आदी कार्यकर्त्यांसोबत झालेल्या शाब्दिक वाद विकोपाला गेल्याचे समजते तर त्याच ठिकाणी एकेकाळी माजी नगरसेवक लखन अरोरा हे भाजपाचे आमदार हरिष पिंपळे यांचे निकट वर्गीय मानल्या जात.

## स्कूल ऑफ स्कॉलर्स च्या 'वीर तानाजी' ने पटकावला करंडक

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**◆ प्रभातचे ' आहुती ' द्वितीय तर स्कूल ऑफ एक्सलंट चे 'स्वयंपूर्ण ' तृतीय**

**अकोला:** विश्वास करंडक बालनाट्य महोत्सवाचा तथा स्पर्धेत कौलखेड येथील स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या बालकांनी सादर केलेल्या 'वीर तानाजी... स्वराज्यस सिंह' या संस्कृत भाषेतील नाटकाने विश्वास करंडक काबीज केला. आहे. प्रभात किड्स ने सादर केलेल्या 'आहुती ' नाटकाने द्वितीय तर अमरावती येथील स्कूल ऑफ एक्सलंटच्या 'स्वयंपूर्ण ' नाटकाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या नाटकांना अनुक्रमेरोख १५०००, ११००० व ७००० रुपयांची रोख पारितोषिके सुद्धा प्रदान करण्यात आलीत.

प्रमिलाताई ओक हॉलमध्ये झालेल्या या बक्षीस वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महोत्सवाचे प्रमुख प्रा. मधु जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सवाचे परीक्षक विनय वैराळे व अकोला आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी सुरज गोळे उपस्थित होते. महोत्सवाचे निमंत्रक प्रशांत गावंडे, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, प्रदीप अवचार, परीक्षक धनंजय सरदेशपांडे व



यतीन माझीरे उपस्थित होते. या सर्वांचे हस्ते विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

प्रशांत गावंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मधु जाधव, विनय वैराळे, सुरज गोळे, परीक्षक धनंजय सरदेशपांडे व यतीन माझीरे यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करून बाल नाट्य कलावंतांना मार्गदर्शन केले. यावर्षीच्या नाट्य स्पर्धेत अमरावती विभागातील २७ शाळांमधील २७ बालनाट्य सादर करण्यात आलीत.

बक्षीस वितरणाच्या प्रारंभी विश्वास करंडकाची खुले नाट्यगृह ते नवीन बसस्थानक या मार्गाने सुमारे पाचशे विद्यार्थ्यांच्या सहभागात मिरवणूक काढण्यात आली. उत्कृष्ट अभिनयासाठी मुलींमधून तानाजी नाटकात तानाजीची भूमिका करणाऱ्या किंजल पालखेडे हिला प्रथम, देशभक्ती नाटकात दुर्गा भाभी ची भूमिका करणाऱ्या स्वरा मानेकर हिला द्वितीय तर आनंदाचे झाड नाटकात आईची भूमिका करणाऱ्या संस्कृती आढाव हिला तृतीय पारितोषिक देण्यात आले. उत्कृष्ट अभिनयासाठी मुलांमधून वत्सल देहाणकर यास प्रथम, लेक वाचवा नाटकात सखाराम पाटील ची भूमिका करणाऱ्या बालकास द्वितीय तर अन्वेष भुजाडे या बालकास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

उत्कृष्ट वेशभूषे करिता आणि सदाफुली रंगीत झाली या नाटकातील पुनम पाचबोलें व प्रज्ञा बेलखेडे यांना प्रथम, ऑपरेशन सिंदूर करिता द्वितीय तर देशभक्ती नाटकाकरिता योगिता घोडके व श्वेता कुलकर्णी यांना तृतीय क्रमांक देण्यात आला. उत्कृष्ट प्रकाश योजने करिता शुभम ठाकरे यांना प्रथम, प्रमोद गोलडे यांना द्वितीय तर महेश इंगळे यांना तृतीय पारितोषिक देण्यात आले. उत्कृष्ट संगीताकरिता प्रणव कोरे यांना प्रथम, पंकज खराबे यांना द्वितीय तर आनंदाचे झाड करिता तृतीय क्रमांक देण्यात आला.

उत्कृष्ट दिग्दर्शनाकरिता वीर तानाजी नाटकाच्या स्वप्ना तायडे यांना प्रथम, स्वयंपूर्ण नाटकाकरिता शुभम ठाकरे यांना द्वितीय तर आहुती नाटकाकरिता चंद्रकांत पोरे यांना तृतीय क्रमांक देण्यात आला.

उत्कृष्ट सादरीकरण लाली नाटकासाठी एजुविला पब्लिक स्कूल पातुरला प्रथम तर पपेट नाटकाकरिता राजेश्वर कॉन्व्हेंट अकोला द्वितीय. नवीन संहिता उत्कृष्ट लेखक पुरस्कार बोन्साय नाटकाच्या रेवती पांडे व पपेट करिता कांचन पटोकार यांना विभागून दिला. उत्कृष्ट नेपथ्य प्रथम लाली नाटकास, द्वितीय वीर तानाजी व तृतीय आहुती नाटकास दिले. याशिवाय उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला शहरात उपलब्ध आहे
परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335
अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605
येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634
वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878
यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816
मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789
पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453
जाहिरातीसाठी संपर्क 9209956616
बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५

## शॉर्टसर्किटमुळे मुडाणा गावात भीषण आग; तीन घरे जळून खाक

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**महागाव** : तालुक्यातील मुडाणा गावात मंगळवारी सायंकाळी सुमारे पाच वाजता महावितरणच्या डीपीजवळ झालेल्या शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत तीन घरे पूर्णतः जळून खाक झाली. घरातील अन्नधान्य, कपडे, फर्निचर, संसारोपयोगी साहित्य व रोख रक्कम जळून नष्ट झाल्याने संबंधित कुटुंबांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्राथमिक माहितीनुसार अविनाश चेंडके यांच्या घरातून आग भडकून वाऱ्यामुळे ती लगतच्या घरांपर्यंत पसरली. गावकऱ्यांनी विहीर व हातपंपाच्या पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला.

अखेर उमरखेड नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने तासभराच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. महसूल विभागाकडून पंचनामा सुरू असून नुकसानग्रस्तांना तातडीने शासकीय मदत देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.


# यवतमाळ जिल्ह्यात लाचेचे आठ प्रकरणे उघड

प्रतिनिधी १५ डिसेंबर

■ राहुल वासनिक

**यवतमाळ :** जिल्ह्यात २०२५ या वर्षात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) आठ वेगवेगळ्या लाचखोरीच्या प्रकरणांत कारवाई करून सरकारी अधिकारी, कर्मचारी आणि खासगी व्यक्तींना जाळ्यात ओढले आहे. महसूल, वन, विज, पंचायत आणि अगदी पोलीस विभागातील अधिकाऱ्यांपर्यंत लाचखोरीचा विस्तार झाल्याने प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचाराची गंभीरता समोर आली आहे. यापैकी सर्वाधिक रक्कम म्हणजे एक लाख रुपये लाच स्वीकारताना अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे ठाणेदार नरेश रणधीर यांना रंगेहाथ पकडले गेले. हे प्रकरण जिल्ह्यातील लाचखोरीच्या वाढत्या प्रमाणाचे द्योतक मानले जात आहे.

## अवधूतवाडी ठाणेदारांची एक लाखाची लाच सर्वाधिक



वर्षाच्या सुरुवातीला, ६ जानेवारी रोजी राळेगाव तालुक्यातील भूमि अभिलेख कार्यालयातील उपअधिक्षक (परिरक्षण भूमापक) अजय देशमुख यांना मयत आईच्या नावाची मिळकतीतील नोंद कमी करण्यासाठी १० हजार रुपये लाच स्वीकारताना एसीबीने अटक केली. राळेगाव पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. त्यानंतर ३० जानेवारीला विज वितरण कंपनीच्या राळेगाव उपविभागातील सहाय्यक अभियंता जगदीश ढुमणे यांनी घरी विजमीटर बसवण्यासाठी ५ हजार रुपये लाच घेतली. तक्रारदाराच्या अर्जावरून ही कारवाई झाली. मार्च महिन्यात लाचखोरीने पोलीस विभागालाही गालबोट लागले. ११ मार्चला दिग्रस पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक नारायण लोंढे यांनी छेडछाड प्रकरणातील युवकाला मारहाण केल्याच्या गुन्ह्यात नाव काढण्यासाठी २ हजार रुपये लाच घेतली. ही रक्कम त्यांनी हवालदार दिलीप राठोड यांना टेंबलमध्ये ठेवायला सांगितली होती. दिग्रस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर दोघांना अटक करण्यात आली.

जुलै महिन्यात लाचखोरीच्या प्रकरणांनी वेग घेतला. १६ जुलैला आर्णी तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाचे उपअभियंता संतोष क्षिरसागर, सेवानिवृत्त कर्मचारी सुरडकर आणि खासगी व्यक्ती सागर भारती यांनी स्मशानभूमी सुशोभीकरणाच्या बिलासाठी १० हजार रुपये (एक टक्का कमिशन) लाच म्हणून स्वीकारले. आर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्याच महिन्यात, २१ जुलैला दारव्हा तालुक्यात महसूल विभागाचे मंडळ अधिकारी जितेंद्र ठाकरे, तलाठी भटकर, जय सोनोने, निलेश तलवारे आणि खासगी व्यक्ती अशोक रमखाम यांनी रेतीचा ट्रॅक्टर पकडल्याच्या प्रकरणात ४० हजार रुपये लाच मागितली. यातील १७ हजार रुपये बँक खात्यात तर ७,५०० रुपये खासगी व्यक्तीकडे देऊन स्वीकारले गेले.

सप्टेंबरमध्ये वन विभागाची लाचखोरी समोर आली. १० सप्टेंबरला यवतमाळ वनविभाग कार्यालयातील वनसेवक सुमित अक्कलवार यांनी सागवाण वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यासाठी १५ हजार रुपये लाच घेतली. यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ऑक्टोबरमध्ये ग्रामपंचायत स्तरावर लाचखोरी उघड झाली. १६ ऑक्टोबरला मारेगाव तालुक्यातील नवरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचिता कुमरे यांनी शाळेच्या संरक्षण भिंतीच्या कामाचे बिल काढण्यासाठी ८० हजार रुपये लाच मागितली होती.

वर्षाच्या अखेरिस, १२ डिसेंबरला जिल्ह्यात खळबळ माजवणारे प्रकरण घडले. अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे ठाणेदार नरेश रणधीर यांनी उसनवारीने दिलेले पैसे परत मिळवून देण्यासाठी तीन लाख रुपये लाच मागितली. तडजोडीअंती पहिला हप्ता म्हणून एक लाख रुपये स्वीकारताना त्यांना एसीबीने ठाण्यातच रंगेहात पकडले. अवधूतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, ही रक्कम वर्षातील सर्वाधिक आहे.

या आठ प्रकरणांत महसूल, विज, वन, पंचायत आणि पोलीस अशा विविध विभागांचा समावेश आहे. लाचेच्या रकमा २ हजारांपासून एक लाखापर्यंत आहेत. एसीबीच्या या कारवायांमुळे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचारावर आळा बसला असला, तरी सामान्य नागरिकांना सरकारी कामांसाठी लाच द्यावी लागते, ही वस्तुस्थिती पुन्हा अधोरेखित झाली आहे. भ्रष्टाचारविरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि जनजागृतीची गरज यानिमित्ताने पुन्हा समोर आली आहे.

## अवैध रेती तस्करी : टिपर जप्त

### चालकावर गुन्हा; मुकुटबन पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १५ डिसेंबर

■ **झरी :** तालुक्यात अवैध रेती तस्करीला उत आलेला असतानाच मुकुटबन पोलिसांनी धडक कारवाई करीत एका टिपरची जप्ती केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे ग्राम नेरड येथे नाकाबंदी करून हा टिपर पकडण्यात आला. या कारवाईमुळे रेती तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.




शनिवारी (१३ डिसेंबर) पोलीस हवालदार विनोद नागरगोजे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पोलीस निरीक्षक विलास कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नेरड येथे नाकाबंदी करण्यात आली. यावेळी टिपर (क्रमांक MH-03-CV-1790) विना परवाना अवैध रेतीची वाहतूक करताना आढळला. पोलीसांनी वाहन जप्त करून ताब्यात घेतले.

या प्रकरणी चालक पवन विलास कार्लेकर (वय ३३, रा. कोढा, ता. तामसवाडी, जि. चंद्रपूर) याच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस निरीक्षक विलास कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली मुकुटबन पोलीस दलाने पार पाडली.

## विचित्र अपघातात तीन जण ठार, एक गंभीर

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**यवतमाळ** : राळेगाव तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ बी वर सांवगी पेरका गावाजवळ शनिवारी सायंकाळी भरधाव सिल्व्हर रंगाच्या वॅगनर कारने (क्र. एमएच ४० एआर ४३८९) मोपेडला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर साखळी अपघात घडला, ज्यात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. एक ट्रकचालक गंभीर जखमी झाला असून, इतर काही जणांनाही दुखापत झाली.

आदित्य दिलीप मरस्कोल्हे वय 27 वर्ष र राळेगाव , गोपाल मडकाम रा.राळेगाव, मोहन लक्ष्मण मेश्राम राळेगाव अशी मृतकांची नावे आहे. तर अजय धनगर धुलिया एम पी असे जखमीचे नाव आहे.






१३ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ७.३० ते ८ वाजेदरम्यान ते आपल्या डिझायर कारने (क्र. एमएच ४९ यू ३३९६) राळेगावहून डोंगरगांवकडे जात होते. सांवगी पेरका जवळ वडकी रोडवरून येणाऱ्या वॅगनर कारच्या चालकाने भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवत पांढऱ्या रंगाच्या ॲक्टिवा मोपेडला (क्र. एमएच २९ एएक्स ४४६१) धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, मोपेडवरील तिघे जण गंभीर जखमी झाले.

या अपघाताची चाहूल लागताच घटनास्थळी लोकांची गर्दी जमली. त्याचवेळी राळेगावकडून वडकीकडे सोयाबीन भरलेला ट्रक थांबला असता, मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने (क्र. एमएच १८ बीझेड १६५७) त्याला धडक दिली. या धडकेत ट्रकचालक कॅबिनमध्ये अडकला आणि गंभीर जखमी झाला.

मोपेडवरील जखमींमध्ये आदित्य दिलीप मरस्कोल्हे (रा. राळेगाव), गोपाल मडकाम (रा. राळेगाव), मोहन लक्ष्मण मेश्राम (रा. राळेगाव) यांचा समावेश होता. तसेच ट्रक अपघातात अजय धनगर (रा. धुलिया, एमपी) जखमी झाले. सर्व जखमींना तातडीने राळेगावच्या शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, आदित्य मरस्कोल्हे यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला, तर गोपाल मडकाम आणि मोहन मेश्राम यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. इतर जखमींना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे रेफर करण्यात आले आहे.

वॅगनर कारचा चालक धडक देऊन पसार झाला असून, त्याच्या विरोधात राळेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा क्रमांक ५०८/२५ कलम २८१, १२५(अ), १२५(ब), १०६(१) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अन्वये नोंदवला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक योगेशकुमार दंदे करीत आहेत.

घटनास्थळी सहायक पोलीस अधीक्षक बंसल, पोलीस निरीक्षक मालते, एपीआय दंडे, पीएसआय बोरकर यांनी भेट दिली. अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. निष्काळजी वाहनचालकांमुळे असे अपघात वाढत असल्याने रस्ता सुरक्षा उपाययोजनांची गरज व्यक्त होत आहे.

## अवैध गोवंश कत्तल व मांस विक्रीचा पर्दाफाश

### दोन आरोपी अटकेत

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**वणी :** वणी पोलिसांनी मोमिनपुरा परिसरात अवैध गोवंश कत्तल व मांस विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करीत दोन आरोपींना जेरबंद केले आहे. ही कारवाई रविवारी सकाळी अकरा वाजता करण्यात आली, ज्यात सुमारे ३३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक गोपाल उंबरकर यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश अपसुंदे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हमिद चौक, मोमिनपुरा येथील मोहम्मद एजाज अब्दूल अजीज कूरेशी (वय ५७) यांच्या घरावर छापा टाकला. तेथे एजाज आणि मोहम्मद कैसर मोहम्मद अजीज कूरेशी (वय



४२, दोघे रा. मोमिनपुरा, वणी) हे गोवंश मांस विक्री करताना रंगेहाथ पकडले गेले.

जप्त मुद्देमालात अंदाजे ७० ते ८० किलो गोवंश मांस (किंमत १६,००० रुपये), चार लोखंडी सत्तूर (८०० रुपये), वजन काटे व मापे (१,२०० रुपये), खिमा मशीन (१५,००० रुपये) आणि प्लास्टिक पिशव्या (६० रुपये) अशा एकूण ३३,०६० रुपये किमतीच्या वस्तूंचा समावेश आहे.

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कनले यांनी मांसाचे नमुने रासायनिक तपासणीसाठी घेतले असून, नाशवंत मालाचा पंचासमक्ष नाश करण्यात येणार आहे.

आरोपींविरोधात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली गेली.

पुढील तपास नायब पोलीस कॉन्स्टेबल विशाल राठोड करीत आहेत. अवैध गोवंश कत्तलीविरोधात पोलिसांची मोहीम सुरूच राहील, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

## पक्षशिस्तीचा भंग महागात

### संतोष ढवळेंची शिवसेना (उबाठा) मधून हकालपट्टी

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**यवतमाळ** : पक्षाच्या अधिकृत भूमिकेला छेद देणारे वर्तन केल्याचा ठपका ठेवत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने यवतमाळ विधानसभा प्रमुख संतोष ढवळे यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. माननीय शिवसेना नेते व पक्षाचे सचिव विनायक राऊत यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पक्षाच्या वतीने देण्यात आली.

यवतमाळ नगर परिषदेतील निवडणूक प्रक्रियेदरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या अधिकृत उमेदवारासह इतर नगरसेवक उमेदवारांच्या विरोधात जाऊन संतोष ढवळे यांनी काँग्रेस पक्षाचा प्रचार केल्याचा आरोप आहे. हे कृत्य पक्षविरोधी असून पक्षशिस्तीचा गंभीर भंग असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात



आले आहे.

या पार्श्वभूमीवर पक्षाने तातडीने कारवाई करत संतोष ढवळे यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून हकालपट्टी केली आहे. पक्षसंघटना व कार्यकर्त्यांमध्ये शिस्त, निष्ठा आणि अधिकृत निर्णयांचे पालन आवश्यक असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट करण्यात आले आहे. ही माहिती जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

## निधी मंजूर असूनही रिंगरोडचे काम रखडले

### पुसदकरांच्या संतापाचा उद्रेक, वाहतूक कोंडी व अपघातांत वाढ

प्रतिनिधी १५ डिसेंबर

**पुसद** : राज्य शासनाने ४८ कोटी ६४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असतानाही पुसद शहराच्या रिंगरोड प्रकल्पाचे अलाइनमेंट काम रखडल्याने नागरिकांच्या संतापात भर पडली आहे. १५ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार पुणे येथील सार्थक इंजिनिअरिंग संस्थेची नियुक्ती झाली होती.

तीन महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असलेले हे काम आता जवळपास दोन वर्षे उलटूनही सुरू झालेले नाही.

रिंगरोड कृती समितीचे अध्यक्ष अशोक बाबर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेक निवेदने सादर केली आहेत. मात्र, दिरंगाई कायम असल्याने प्रकल्पाच्या खर्चात २५ ते ३० टक्क्यांची वाढ अपरिहार्य झाली आहे. हा अतिरिक्त भार शासनाबरोबरच जनतेवरही पडणार आहे.

रिंगरोड नसल्यामुळे बाहेरून येणारी जड वाहने शहराच्या मध्यवर्ती भागातूनच मार्ग काढत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडीचा रोजचा सामना करावा लागत असून अपघातांची संख्याही वाढली आहे. वाहतूक पोलिसांना जड वाहनांचा वाढता भार हाताळणे कठीण जात आहे.

शहर विकास आराखड्यातील तीन प्रमुख डीपी बायपास रस्ते नगरपरिषदेकडून विकसित न झाल्याने नागपूर, चंद्रपूर, वाशिम, औरंगाबाद व पुणे मार्गांची वाहतूक शहरात शिरत आहे. हे रस्ते वेळेत पूर्ण झाले असते तर वाहतूक शहराबाहेरून वळवणे शक्य झाले असते.

उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल यांनी डीपी रोडच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार केला आहे.

तरीही सर्वेक्षण व प्रस्ताव प्रक्रियेला वेग न मिळाल्याने नागरिकांची नाराजी वाढत आहे. निधी उपलब्ध असतानाही काम रखडल्याने तातडीने सर्वेक्षण पूर्ण करून रस्ते विकसित करण्याची मागणी आता तीव्र झाली आहे.

## हॉटेल, चहा टपऱ्यांवर घरगुती गॅस सिलेंडरचा बिनधास्त वापर

प्रतिनिधी १५ डिसेंबर

■ **दिग्रस :** शहरासह तालुक्यातील हॉटेल, वडापाव केंद्रे, स्वीट होम, चहा टपऱ्या आणि रस्त्यावरील गाड्यांवर घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास आणि बिनधास्त वापर होत आहे. विशेषतः रहदारीच्या ठिकाणी उघड्यावर हे सिलेंडर वापरले जात असल्याने कोणतीही अनुचित घटना घडल्यास मोठी जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता आहे. तरीही अशा व्यावसायिकांवर कारवाई न होणे ही गंभीर बाब मानली जात आहे.



शासनाच्या सवलतीच्या योजनेतून घरगुती वापरासाठी कमी दरात उपलब्ध होणारे हे सिलेंडर व्यावसायिक हेतूने वापरणे पूर्णतः बेकायदा आहे. तरीही शहरातील शिवाजी चौक, बाजार लाइन, मानोरा चौक, आर्णी नाका, तहसील चौक परिसरासह तालुक्यातील विविध ठिकाणी व्यापारी वर्ग निर्भयपणे या सिलेंडरचा वापर करताना दिसत आहे. यावेळी सुरक्षेच्या कोणत्याही नियमांचे पालन केले जात नसल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे.

याशिवाय काही वाहनांमध्येही अनाधिकृतपणे घरगुती सिलेंडर बसवले जात असल्याचे उघड होत आहे. काहीजण तर असे सिलेंडर चढ्या दराने विकून काळाबाजार करत असल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व प्रकारांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

प्रशासनाकडून अशा व्यावसायिकांवर कोणतीही धाडसी कारवाई होत नसल्याने त्यांचे धाडस दिवसेंदिवस वाढत चालले आहे. यामुळे काळाबाजार आणि बेकायदा वापर थांबविण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी भावना स्थानिकांमध्ये आहे.

संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर या प्रकरणी लक्ष घालून कारवाई करावी, अन्यथा मोठा अपघात ओढवण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असे नागरिकांचे मत आहे. याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार सागर गोपाळराव सलामे राहणार पिंपळगाव तालुका महागाव जिल्हा यवतमाळ यांचे वडील गोपाळराव हसनाजी सलामे यांचा मृत्यू मौजे पिंपळगाव ईजारा तालुका महागाव येथे दिनांक 3 5 2001 रोजी झाला आहे. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद सचिव ग्रामपंचायत पिंपळगाव ईजारा ता. महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र मृत्यू नोंदणी अधिनियम कलम 13 ३ सचिव ग्रामपंचायत पिंपळगाव ईजारा यांना ती नोंद घेण्याप्रकरणी या कार्यालयास सादर केले आहे. तरी हितसंबंध व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामा बाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरूपात पंधरा दिवसाच्या आत या कार्यालयात सादर करावेत. त्या नंतर येणाऱ्या आक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही यांची आक्षेपकर्त्यांनी नोंद घ्यावी.

स्वा./-

तहसीलदार, महागांव

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

तहसिलदार महागांव यांचे कार्यालय, महागांव

Email id- tgp.mahagoan@gmail.com दुरध्वनी क्रमांक 07236-222238

क्रमांक/म.स./जन्म नोंद/कावि/401/2025 दिनांक : 07/11/2025

प्रति,

1. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महागांव
2. ग्रामीन पोलीस निरीक्षक पो. स्टेशन महागांव
3. वैधकीय अधिकारी महागांव
4. मंडळ अधिकारी मोरथ

**विषय** :- जन्म नोंद नोंदविणे प्रकरणात अहवाल सादर करणेबाबत

**संदर्भ** :- शासन निर्णय क्रमांक जमृनों/2525/ई. ऑ.991181/प्र.क्र.22/कु.क दि. 12 मार्च, 2025

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये अर्जदार विजय दुधराम आडे रा सेनंद यानी त्यांच्या मुली करीता ममता विजय आहे जन्माची नोद : दि.04/06/1990 रोजी जन्म झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचीव ग्रा.पं सेनंद ता. महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नुसार नगर सचीव ग्रा.पं. सेनंद त्यांच्या जन्माची नोद घेण्याबाबत आदेशित करणेबाबतचे प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते कि, सदर अर्जाचे अनुषंगाने अर्जदार यांच्या मुलीच्या / जन्माची नोंदणी आपले अभिलेख रजिएरला पडताळणी करून संबधीत व्यक्तीची जन्माची नोंद आहे किंवा नाही, तसेच सदर व्यक्तीचा जन्म कुठे व कधी झाला याबाबत चौकशी करून आवश्यक दस्तऐवजासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करावा. सदर आपल्या अहवाला अभावी प्रलंबित राहील्यास सर्वस्वी आपली जबाबदारी राहील यांची नोंद घ्यावी.

स्वा./-

तहसीलदार, महागांव

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५

नेत्यांचे मागणी पत्र,
अन् श्रेयवादाचे सत्र,
आश्वासनच मात्र...

प्रकल्प नाही आले
विकासाचे झाले येले
पाटबंधारे मंडळ गेले

# जिल्हा उपेक्षित, अधिवेशनात दुर्लक्षित कायम आकांक्षित !

## *रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी *जिल्हा नदी जोड मधून वगळला...

• अतिष देशमुख @ वाशीम •

वाशीम जिल्ह्याची आकांक्षीत जिल्हा म्हणून नोंद आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी वेगळा निधी येणे तर सोडा पाठबंधारे मंडळही गेले. कोणतेच मोठे प्रकल्प नाही आले. जिल्ह्याचा नदीजोडमध्ये अद्यापही समावेश झाला नाही. तर वाशीम शहरातून जाणारा रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरी होत आहे. सिंचनाचा अनुषेश कायम असून कायद्या व नियम वाशीम जिल्ह्यासाठी नसल्याचे दिसून येत आहे. अधिवेशनातही जिल्ह्याकडे दुर्लक्ष झाले असून नेत्यांचे मात्र, कायम मागणी सत्र सुरू आहे. श्रेयवादासाठी मात्र, आश्वासनावर आश्वासन देवून जिल्ह्याला उपेक्षीतच ठेवल्या जात आहे.





आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.


लोकप्रतिनिधींना विकासाचे नाही 'भान', नितीन गडकरींनी टोचले 'कान'! गडकरी साहेब, खरे अन् स्पष्ट बोलतात


नितीन गडकरी साहेब, जिल्ह्यातील... लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना, नाही शरम, झाले बेशरम! राजकारणी झाले व्यापारी, जनतेला केले भिकारी


अधिकाऱ्यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेने वाशीम जिल्ह्यातील जलसंधारणाची कामे रखडली!


अनेक प्रकल्प रखडले... जिल्ह्याचा विकास खुंटला! श्रेयवादाची लढाई लढा, अन् विकासाचा मार्ग काढा


चौकशीही नाही, अन् कारवाई नाही!


भ्रष्टाचाराने पोखरले, अनेक प्रकल्प रखडले, रस्ते उखडले! गडकरी साहेब, खरे अन् स्पष्ट बोलतात

## जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलानंतर !

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक आहे. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही.यावरून निष्क्रीयता सिध्द होते.



## जिल्ह्याच्या विकासासाठी, सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा

नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळल्याचे वृत्त मालिका सातत्याने सांध्य. दै. सिटी न्युज सुपरफास्ट लावून धरत आहे. तर या सिंचनाचा अनुषेश भरूण काढण्यासाठी व मागासलेले पण दुर करण्यासाठी ,विकासाचा मार्ग काढण्यासाठी ,रखडलेले प्रकल्प पुर्ण करण्यासाठी, रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ,भ्रष्टाचाराच्या विरोधात सिटी न्युज सुपरफास्ट सातत्याने पाठपुरावा करून प्रत्येक भ्रष्टाचाराच्या व न्यायाच्या शेकडो वृत्त मालिका लावून लक्ष वेधत असते तरी सुध्दा मात्र आकांक्षीत जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून कलंक पुसण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही फक्त निवेदनाचे पत्र देवून श्रेयवादाचे सत्र सुरू आहे. जिल्हा वासीयांना मात्र आश्वासनच मिळत आहे.

## नितीन गडकरींनी आतापर्यंत ३ वेळा टोचले कान, विकासाचे नाही भान ...

केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी वाशीम जिल्ह्यातील अधिकाऱ्यांबद्दल अकोला येथील कार्यक्रमात २ वर्षापूर्वी अधिकाऱ्यांच्या लक्ष्मी दर्शनामुळे जिल्ह्यातील प्रकल्प रखडले असल्याचे सांगितले तर ६ महिन्यापूर्वी हिंगोली येथील कार्यक्रमात वाशीमच्या लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे आणि मी विसरल्यामुळे ६ वर्षापूर्वी एका कार्यक्रमात मुंजर केलेला रस्त्याच्या कामाचा पाठपुरावा न केल्याने हे रस्त्याचे काम अपूर्ण राहील्याचे जाहीरपणे सांगितले होते. वाशीम येथील कार्यक्रमातही लोकप्रतिनिधींना विकासाचे नाही 'भान', गडकरींनी पुन्हा टोचले 'कान' यावरून अधिकाऱ्यांच्या लक्ष्मीदर्शनामुळे प्रकल्प रखडले आहेत. तर लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळेच जिल्ह्याचा विकास खुंटल्याचे जाहीर झाले आहे. मात्र तीन वेळा नितीन गडकरींनी अधिकारी व लोकप्रतिनिधींचे कान टोचूनही त्यांना शरम नाही ते बेशरम झाले आहे. राजकारणी व्यापारी झाल्याने जनता भिकारी होत आहे. श्रीमंत श्रीमंत होत चालला तर गरीब गरीब होत चालला आहे.

### अकोला

वाशीम जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या लक्ष्मीदर्शनाच्या लालसेमुळे अनेक प्रकल्प रखडले असल्याचे जाहीर वक्तव्य चार वर्षापूर्वी अकोला येथील कार्यक्रमात केले. या संदर्भात आपण वाशीम जिल्हा अधिकाऱ्यांसोबत फोनवर बोलून संबंधित अधिकाऱ्यांबद्दल नाराजी व्यक्त केली होती. असे ना. नितीन गडकरी म्हणाले होते.

### हिंगोली

अकोला -नांदेड महामार्गातील वाशीम शहरातून जाणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी ६ वर्षापूर्वीच पाटणी कॉम्प्लेक्सच्या कार्यक्रमात मंजुरी दिली. मात्र लोकप्रतिनिधी या कामासाठी पाठपुरावा न केल्यामुळे हे काम अपूर्ण राहीले. आणि आपणही विसरून गेल्याचे ना. गडकरी यांनी हिंगोली येथील कार्यक्रमात सांगितले. यावरून वाशीमचे लोकप्रतिनिधी किती कर्तव्यदक्ष आहे हे सिध्द होते.

### वाशीम

वाशीम येथील कार्यक्रमात नगर पालिकेकडे पैसे नसतील तर विष घ्यायला पैसे आहेत का असा टोला गडकरींनी दिला होता. तर आमदार , खासदारांनी ठेकेदारांना त्रास देवू नये, विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. अशी ग्वाहीही दिली. मात्र श्रेयवादाची लढाई लढा अन् विकासाचा मार्ग काढा असे त्यांनी वाशीम येथील कार्यक्रमात सांगितले.

### अधिवेशन

हिवाळी अधिवेशनात आता पुन्हा नदीजोड प्रस्तावासाठी जलसंपदा मंत्री, सचिव विभागातील वरिष्ठ अधिकारी , आ.अमित झनक, आ. सईताई डहाके यांच्या उपस्थितीत बैठक झाली आहे. मात्र नदीजोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश केव्हा होणार याकडे लक्ष लागले आहे.


जिल्हयात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर ! *लोकप्रतिनिधीचे प्रयत्न निष्फळ* अखेर पाटबंधारे मंडळ कार्यालयाचे शेगांव येथे उदघाटन नितीन गडकरींनीही व्यक्त केले होती नाराजी


पाटबंधारे विभागाचा भ्रष्टाचार निवळला, जिल्हा नदीजोड प्रकल्पातून वगळला!


खुद्द मुख्यमंत्र्याकडूनच कळले... नदी जोड प्रकल्पातून जिल्ह्याला नाही वगळले! *दुसऱ्या टप्प्यात होणार समावेश - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन


भ्रष्टाचार जडला, श्रेयवाद नडला... नदीजोडला जिल्हा नाही जोडला! *अधिवेशनात पुन्हा बैठकीचे सत्र * आकांक्षीत जिल्हा म्हणून कलंकच मात्र

## थोडक्यात

### भाजपकडून १६ बंडखोर सहा वर्षांसाठी निलंबित !

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षशिस्त मोडत अधिकृत उमेदवारांविरुद्ध उमेदवारी दाखल करणाऱ्या १६ बंडखोरांवर भारतीय जनता पक्षाने कठोर कारवाई केली आहे. १२ डिसेंबर रोजी भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी या सर्वांना पुढील सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्याचा निर्णय जाहीर केला.

निलंबित सदस्यांमध्ये जिल्हा चिटणीस करूणा कल्ले, महिला मोर्चा जिल्हा महामंत्री छाया पवार, माजी नगरसेवक प्रभाकर काळे, माजी युवा मोर्चा अध्यक्ष वैभव उलेमाले, सदस्य राजेश विश्वकर्मा, आशा खटके, गजानन ठेंगडे, माजी जिल्हा उपाध्यक्ष धनंजय हेंद्रे, वाशिम शहर उपाध्यक्ष संगिता पिंजरकर, मदन राठी, मुकेश चौधरी, अनंत रंगभाळ, उत्तर आघाडी प्रकोष्ठांचे सावंतसिंग ठाकूर, 'बेटी बचाओ बेटी पढ़ाओ' सेलचे प्रमुख सचिन पेंढारकर, महिला शहर उपाध्यक्ष अनिता इंगोले आणि गजू लांडगे यांचा समावेश आहे. पक्षशिस्त भंग करणाऱ्यांबाबत कोणतीही सहानुभूती न दाखवण्याचा निर्धार पक्षाने स्पष्ट केला आहे. दरम्यान, पक्षातील कुठल्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्याने पक्षविरोधी भूमिका घेतल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे सुतोवाच जिल्हाध्यक्षांनी केले.

# हिवाळी अधिवेशनात आ. अमित झनकांचा 'झंकार' !

## विधानभवनातील झलक, ठरली कर्तृत्वाची चमक

• वसंत खडसे @ रिसोड •

जिल्ह्यातील रिसोड - मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांच्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले जात आहे. विदर्भाची राजधानी असलेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात त्यांनी वाशिम जिल्ह्यातील मांडलेल्या अभ्यासपूर्ण लक्षवेधी सूचनांची ' चमक ' केवळ जिल्ह्यातच नव्हे; तर राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. राज्यातील तरुण हे आपले भविष्य असून त्यांच्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे ! अशी ठाम भूमिका घेत जिल्ह्यातील अनेक समस्या त्यांनी अधिवेशनादरम्यान उजागर केल्या आहेत. आ. अमित सुभाषराव झनक यांचा सभागृहातील हा ' झंकार ' जिल्हाभरात कौतुकाने चर्चिला जात आहे.

जिल्ह्याचे सुपुत्र, राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री लोकनेते स्व. सुभाषराव झनक यांनी आपली संपूर्ण कारकीर्द गोरगरीब व शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी घालविली. शेतकऱ्यांचे कैवारी




म्हणून त्यांचा रिसोड, मालेगाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक होता. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व सामान्य जनतेने त्यांना ' बळीराजा ' ही उपाधी बहाल केली. मात्र त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी रिसोडचे विद्यमान आमदार अमित झनक यांच्यावर पडली. शेती व शेतकरी यांच्यावर असलेली निष्ठा व गोरगरीब जनतेप्रती असलेला कणवळा ही झनक घराण्याची संस्कृती आणि वडील स्व. सुभाषराव झनक यांच्याकडून राजकारणाचे बाळकडू मिळालेले आ. अमित झनक आपल्या घराण्याचा वारसा समर्थपणे पेलत आहेत. सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत प्रखर मोदीलाट असतांना सुद्धा विजयश्री प्राप्त करत एक युवा आमदार म्हणून त्याचं नेतृत्व उदयास आलं आहे. तेंव्हापासून सलग चारवेळा विजयी होण्याची किमया करून आ. अमित झनक यांनी जिल्ह्यातील कॉंग्रेसचं अस्तित्व अबाधित ठेवलं आहे. सातत्याने विरोधी बाकावर असून देखील त्यांनी आपल्या मतदार संघातील व जिल्ह्यातील समस्या सोडवण्यासाठी पोटतिडकीने प्रयत्न केला आहे. त्यांचा अभ्यासूपणा आणि समस्यांची प्रभावी मांडणी पाहून सत्ताधारी त्यांना नेहमीच सकारात्मक प्रतिसाद देतात हे अनेक वेळा संपूर्ण जिल्हावासियांनी अनुभवले आहे. विधानभवनातील चर्चासत्र असो अथवा अधिवेशनातील विशेषसत्र असो आ. झनक आपल्या जिल्ह्यातील व मतदार

## अधिवेशनातील लक्षवेधी सूचनांची 'झलक'...

८ डिसेंबर पासून सुरू झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात १४ डिसेंबरच्या समाप्तीपर्यंत आ. अमित झनक यांनी जिल्ह्यातील अनेक उणीवा सरकारच्या निदर्शनात आणून दिल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी पैनगंगा - नळगंगा नदी जोड प्रकल्पाचा विशेष मुद्दा उपस्थित केला आहे. सोबतच जिल्हावासीयांच हक्काचं असलेलं पाणी बुलढाणा जिल्ह्यातील पेनटाकळी व कोराडी धरणातून सोडण्यात यावं अशी कळकळीची मागणी केली. तद्वतच ग्रामपंचायत कर्मचारी व उमेद अभियानाअंतर्गत महिलांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावावेत अशी सरकारकडे विनंती केली. शिवाय वन्य प्राण्यांमुळे शेती नुकसानीवर तातडीने उपाय - योजना करण्यात यावी, शेतकऱ्यांच्या शेती उपयोगी वस्तूंची चोरी वाढली असून भुरट्या चोरांचा बंदोबस्त कारवा जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

तसेच अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांसाठी तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा व मालेगांव तालुक्यातील डव्हा फाटा - डव्हा मंदिर रस्ता आणि मेडशी रस्त्यावरील पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची जोरकस मागणी केली. शिरपूर परिसरातील संपूर्ण महसूली भाग पोखरा योजनेत समाविष्ट करून वाशिम जिल्ह्यात मेडिकल इन्स्ट्रूमेंटचा कारखाना उभारून यापूर्वी जाहीर केलेले लॉजिस्टिक पार्कचे काम सुद्धा तातडीने सुरू करावे अशी ठाम मागणी केली. सोबतच तरुण जिल्हा असलेल्या वाशिमध्ये एमआयडीसीचा विस्तार करून उद्योगांना मुबलक वीज पुरवठा करण्यात यावा जेणेकरून उद्योगांना गती मिळेल व मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. नगरपंचायत क्षेत्रातील रोजगार हमी योजनेबाबत असलेल्या अडचणी दूर करून वाशिम जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने न्याय देण्याची मागणीही आ. अमित सुभाषराव झनक यांनी अधिवेशनात केली. त्यांची विधानभवनातील ही ' झलक ' म्हणजे सर्व सामान्य जनतेचे प्रश्न, तरुणांचे भविष्य, शेतकऱ्यांचे हित आणि जिल्ह्याचा विकास यासाठी असलेली धडपड पाहता हा आ. झणकांचा ' झंकार ' असल्याचे सर्व सामान्य लोक कौतुकाने बोलत आहेत.

# सिटी न्यूज सुपरफास्ट

सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com


# कृषीनगरात कचरा व्यवस्थापनाचा बोजवारा





आशिष पवित्रकार सुनिता अग्रवाल अनिल मुरुमकार

**प्रभाग क्र. 13**

प्रभाग १३ हा शहरातील काही महत्त्वाच्या भागांना आपल्या कक्षेत घेतो. जवाहर नगर आणि शास्त्री नगरसारख्या प्रतिष्ठित वस्त्या याच प्रभागात येतात. तसेच, हद्दवाढीतील शिवर गावासुद्धा याच प्रभागात समाविष्ट करण्यात आले आहे. शिवर ग्रामपंचायत असतानाच येथील रस्ते आणि गटारांची कामे सुरू होती. त्यानंतर हा परिसर महापालिकेत सामील झाला. प्रमुख प्रभागांपैकी एक असलेल्या या प्रभागात सिमेंटचे रस्ते, बागबगीच्यांचे नूतनीकरण, नालेसफाई यांसारखी विकासाची कामे झाली असली तरी, या सुविधांचा लाभ सर्व वस्त्यांना समान प्रमाणात मिळालेला नाही. काही विभागांमध्ये पायाभूत सुविधांची उत्तम सोय झाली आहे; तर काही वस्त्यांमध्ये अद्यापही प्राथमिक सुविधांचा अभाव आहे.

प्रभाग १३ चे विदारक चित्र समोर येते. सिमेंटचे रस्ते झाले, उद्याने सजली; पण कचरा व्यवस्थापन, पथदिवे आणि गटारांचा प्रश्न कायम आहे. या प्रभागात उच्चभ्रू वस्त्या, मोठी बाजारपेठ, कृषीनगरसारखा दाट लोकवस्तीचा भाग आणि हद्दवाढीतील शिवरचा समावेश आहे. मागील काही वर्षांमध्ये या प्रभागात काँक्रिट रस्त्यांची निर्मिती, गटार बांधकामे आणि उद्यानांचे सुशोभीकरण यांसारखी कामे वेगाने झाली आहेत. मात्र, विकासाचा हा वेग सर्वत्र सारखा नसल्याचे स्पष्ट चित्र आहे. एका बाजूला विकासात्मक कामांची भरभराट दिसत आहे, तर दुसऱ्या बाजूला अनेक भागात मूलभूत नागरी सुविधांची वानवा आहे. विशेषतः हद्दवाढीतील शिवर भागात शहराच्या तुलनेत विकासाचे काम अपेक्षेप्रमाणे झालेले नाही. कचरा गोळा करण्याची प्रक्रिया नियमित नसल्यामुळे नागरिकांना कचरा रस्त्यांवर मोकळया जागेत टाकावा लागत आहे, हे वास्तव आहे. यंदा या प्रभाग क्रमांक तेरा मध्ये अ भाग हा अनुसूजित जातीसाठी राखीव आहे. तर ब भाग हा ओबीसी महिलेसाठी राखीव आहे अर्थात नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलेसाठी राखीव आहे. तर क भाग हा सर्वसाधारण महिलेसाठी राखीव आहे. प्रभाग तेरा मधील ड भाग हा सर्वसाधारण अर्थात खुल्या प्रवर्गासाठी आहे.



जवाहर नगर, शास्त्रीनगर, गोकुळ कॉलनी, टेलीफोन कॉलनी, तोष्णीवाल लेआऊट या वस्त्या शहरातील विकसित निवासी क्षेत्र म्हणून ओळखल्या जातात. या परिसरातील सिमेंटचे रस्ते, गटारांची स्वच्छता, उद्यानांची उत्तम देखभाल यामुळे अर्ध्या भागातील नागरिक संतुष्ट आहेत. पण कृषीनगरचा काही हिस्सा, रवी नगर, मुकुंद नगर, पिंपळेनगर तसेच हद्दवाढीतील शिवर परिसरात विकासात्मक कामांची गती मंदावलेली दिसते. प्रभाग १३ मध्ये काही भागांत पाणीपुरवठा अनियमित असतो. कृषीनगर, रवी नगर, मुकुंद नगर, पिंपळेनगर येथील नागरिकांनी पाणीपुरवठा अनिश्चित होत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत.

## मागील निवडणुकीत भाजपला यश

२०१७ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत प्रभाग १३ मधील सर्वच्या सर्व चारही जागांवर भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी विजयश्री मिळवली होती. लोकसंख्या आणि भौगोलिक क्षेत्राच्या दृष्टीने हा प्रभाग मोठा आहे. मागील निवडणुकीत प्रभाग १३ 'अ' गटातून भाजपच्या तिकिटावर सुजाता देवराव अहीर (मते ८१२१), 'ब' मधून अनिल सुनिल मुरुमकार (५६४३), 'क' मधून सुनिता विजय अग्रवाल (५६१९), 'ड' मधून आशिष गणेशराव पवित्रकार (८०३०) हे निवडून आले होते. इच्छुक कामाला लागलेल्या प्रभागात उमेदवारीसाठी इच्छुकांची संख्या मोठी आहे. प्रभागनिहाय आरक्षण जाहीर झाल्यावर काहींना फायदा झाला आहे. प्रभागातील काही भागांत मोठ्या प्रमाणावर रस्ते, गटारांची कामे, उद्यानांचे नूतनीकरण करण्यात आले. मागील निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व या प्रभागात होते. भाजपच्या तिकिटासाठी विद्यमानांसोबतच अनेक इच्छुकांनी अनेक महिन्यांपासून मोर्चेबांधणी सुरू केली आहे. तिकिट वाटपासाठी मोठी चढाओढ दिसणार आहे. इच्छुकांनी अनेक दिवसांपासून विविध माध्यमातून प्रभागात अनुकूल वातावरण तयार करण्याचे प्रयत्न चालवले आहेत.

## प्रभागातील तातडीची गरज

कृषी नगर, पिंपळे नगरातील काही रस्त्यांचे सिमेंटीकरण गटारांची मोठ्या प्रमाणावर साफसफाई आणि पक्की बांधकामे नियमित पाणीपुरवठा होणे अंतर्गत रस्त्यांवर स्ट्रीट लाईट्स बसवणे पाणीपट्टीची भरमसाठ देयके शिवर भागातील रहिवाशांनी पाणीमीटरची यथा योग्य तपासणी न करताच सरसकट हजारोंच्या घरात पाणीपट्टीची बिले पाठवल्याबद्दल नारजी व्यक्त केली आहे. नागरिकांचे पाणीमीटर बंद असतानाही २० ते ३० हजार रुपयांपर्यंत बिले आली आहेत. काही ठिकाणी मीटर फिरत नाहीत, तर काही मीटर खराब असूनही त्यावर आधारित अवाजवी रक्कम आकारल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. बिलांमध्ये प्रचंड विसंगती असून, जिथे महिन्याला साधारण १५० रुपयांचे बिल अपेक्षित आहे, तिथे अचानक २० ते ३० हजारांचे देयक आल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. मोकळया जागी कचरा, स्वच्छतेचा बोजवाराकचरा व्यवस्थापन हा प्रभागातील एक गंभीर प्रश्न आहे. शिवर, पिंपळेनगर, रवी नगर, कृषीनगरचा काही भाग आणि शिवर परिसरात उघड्यावर कचरा फेकणे ही दैनंदिन बाब झाली आहे. महापालिकेची कचरा संकलन गाडी काही भागांत दररोज येते, तर काही ठिकाणी पाच-सहा दिवसांचा विलंब होतो. कचरा साचल्यामुळे डास, माश्या आणि दुर्गंधीचा त्रास होतो. उघड्यावर कचरा टाकल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, स्वच्छतेचा पार बोजवारा उडाला आहे.

प्रभाग क्र १२ मधील आरआरसी चा **रणसंग्राम** हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा

## प्रभागातील नागरिकांच्या प्रतिक्रिया

प्रभागात अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा अनियमित आहे आणि कचऱ्याचा प्रश्न तसाच आहे. प्रत्येक निवडणुकीत आश्वासने दिली जातात. गटारे स्वच्छ होत नाहीत, पथदिवे अनेक ठिकाणी बंद आहेत. परिसरात डेंग्यू, मलेरियाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून स्वच्छता असणे अनिवार्य आहे. रवी नगर गेल्या काही वर्षांत रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. आताही आमच्या भागात काही सिमेंट रस्ते मंजूर झाले आहेत. गटारांची कामे झाली आहेत. पथदिवे बंद असल्यामुळे ही कामे व्हायला हवीत. कृषीनगर मनपाने कचरा वाहनांचे वेळापत्रक प्रत्यक्षात पाळले जात नाही. त्यामुळे आम्हाला कचरा घरात साठवून ठेवावा लागतो किंवा खुल्या जागी टाकावा लागतो. याचा परिणाम आरोग्य आणि स्वच्छतेवर होतो. पाण्याची बिले अवाजवी आली आहेत. आमच्या भागात उद्यानांची दुरुस्ती, नवीन रस्त्यांची कामे झाली आहेत. कचरा संकलन वेळेवर व्हावे तसेच आमच्या भागातील पथदिवे बसविण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी मागणी नागरिकांची आहे. कृषी नगरप्रभागात काही रस्त्यांचे सिमेंटीकरण झाले, मात्र गटारांचे काम अपूर्ण राहिल्यामुळे पावसाळयात परिसरात पाणी साचते. दुर्गंधी, कचरा आणि डास यामुळे आजारांचे प्रमाण वाढते. गोकूळ कॉलनीपथदिव्यांच्या अभावी अंधारअनेक रस्त्यांवर पथदिवेच नाहीत किंवा लावलेले दिवे बंद आहेत. अंधाराचा फायदा घेऊन चोरीच्या घटना घडतात. महिलांना रात्री प्रवास करणे कठीण झाले आहे. प्रशासनाने या समस्येकडे कधीही लक्ष दिले नाही, अशी टीका नागरिक करत आहेत.



**प्रभागाचा परिसर :** कृषीनगर, गोयनका लेआऊट, गोकुळ कॉलनी, टेलीफोन कॉलनी, रवी नगर, मुकुंद नगर, पिंपळेनगर, तोष्णीवाल लेआऊट, जवाहर नगर, लाला लजपतराय सोसायटी, शास्त्रीनगर परिसर, कंवर नगर, शिवर, 'पीडीकेव्ही'चा परिसर.

# विकास कुठे आहे, प्रभागातील नागरिकांचा प्रश्न







दिपाली जगताप किरण बोराखडे मंगेश काळे विशाल इंगळे

शहराची हद्दवाढ झाल्यानंतर शहरात आलेला महत्वाचा भाग मलकापूर ग्रामपंचायतचा होता. त्यामुळे या प्रभागात ग्रामपंचायत काळातील समस्या जैसे थे असून विकास कुठे आहे. असा प्रश्न सामान्य जनतेला पडतो. मुख्य रस्त्यावर विकास दिसतो. पण, मलकापूर आणि शिवनी भागातील विकास कामे मात्र झाल्याचे चित्र नाही. शहराचा समतोल विकास अपेक्षित असताना या ठिकाणी विकासाच्या पाऊलखुला मात्र पडलेल्या दिसत नाही. प्रभाग क्रमांक चौदा हा मलकापूर म्हणून ओळखला जातो. या प्रभागात शिवनी व मलकापूरचा समावेश होतो. या प्रभागात एम आय डी सी भाग वगळला आहे. शहर मलकापूर भागात वाढते आहे. त्या दृष्टीने कुठलेही नियोजन दिसत नाही.

**प्रभाग क्र. 14**

प्रभाग क्रमांक चौदा अर्थात मलकापूर या मध्ये भाजपचे विशाल इंगळे हे अ भागातून विजयी झाले होते. तर विशाल इंगळे यांच्यासाठी ही निवडणुक अतिशय चुरशीची ठरली होती. ते केवळ दोन मतांनी जिंकले होते. विशाल इंगळे यांनी प्रवीण पातोडे यांचा पराभव केला होता. भारिप बमसंच्या किरण बोराखडे या ब भागातून विजयी झाल्या होत्या. त्यांनी पुजा वाघ यांचा पराभव केला होता. तर भाजपच्या दिपाली जगताप क भागातून विजयी झाल्या होत्या. त्यांनी किरण पाखरे यांचा पराभव केला होता. या प्रभागाच्या ड भागातून शिवसेनेचे मंगेश काळे विजयी झाले होते. त्यांनी शेख शमसुकमर साबीर यांचा पराभव केला होता. २०१७ च्या राजकीय परिस्थितीनंतर आता परिस्थिती बदली आहे. यंदा प्रभाग चौदाचे आरक्षणात मोठा फेरबदल झाला आहे. यात अनुसूचित जाती महिलेसाठी प्रभाग चौदा मधील अ भाग राखीव आहे . तर ओबीसी महिलेसाठी प्रभागातील ब भाग राखीव आहे. सर्वसाधारण अर्थात खुल्या गटातील महिलेसाठी क भाग राखीव आहे तर सर्वसाधारण अर्थात खुल्या गटासाठी क भाग राखीव आहे.






प्रभाग क्र १४ मधील आरआरसी चा **रणसंग्राम** हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा

शिवनी भागात काही रस्त्यांचे सिमेंटीकरण झाले, मात्र गटारांचे काम अपूर्ण राहिल्यामुळे पावसाळयात परिसरात पाणी साचते. दुर्गंधी, कचरा आणि डास यामुळे आजारांचे प्रमाण वाढते. पथदिव्यांच्या अभावी अंधार आहे. अनेक रस्त्यांवर पथदिवेच नाहीत किंवा लावलेले दिवे बंद आहेत. अंधाराचा फायदा घेऊन चोरीच्या घटना घडतात. महिलांना रात्री प्रवास करणे कठीण झाले आहे. प्रशासनाने या समस्येकडे कधीही लक्ष दिले नाही, अशी टीका नागरिक करत आहेत.

प्रत्येक निवडणुकीत आश्वासने दिली जातात. गटारे स्वच्छ होत नाहीत, पथदिवे अनेक ठिकाणी बंद आहेत. परिसरात डेंग्यू, मलेरियाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून स्वच्छता असणे अनिवार्य आहे. शिवनीत गेल्या काही वर्षांत रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. आताही आमच्या भागात काही सिमेंट रस्ते मंजूर झाले आहेत. गटारांची कामे झाली आहेत. पथदिवे बंद असल्यामुळे ही कामे व्हायला हवीत. मलकापूर परिसरात मनपाने कचरा वाहनांचे वेळापत्रक प्रत्यक्षात पाळले जात नाही. त्यामुळे आम्हाला कचरा घरात साठवून ठेवावा लागतो किंवा खुल्या जागी टाकावा लागतो. याचा परिणाम आरोग्य आणि स्वच्छतेवर होतो. पाण्याची बिले अवाजवी आली आहेत.आमच्या भागात उद्यानांची दुरुस्ती, नवीन रस्त्यांची कामे झाली आहेत. कचरा संकलन वेळेवर व्हावे तसेच आमच्या भागातील पथदिवे बसविण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी मागणी शिवनी व मलकापूर च्या नागरिकांची आहे.






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK